**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५८८

सुनावणी दिनांक १९.११.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. साहेबराव पुंडलिकराव कराड,<br>रा. चिखली, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी : | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर,<br>तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | प्रतिवादी : | |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, अहमदपूर, तालुका अहमदपूर,<br>जिल्हा लातूर | | | :अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी : | नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय, अहमदपूर,जि.लातूर | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०५.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मोर नं. ७८७/०८ मौजे केंद्रेवाडी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी गैरअर्जदार यांना लेखी नोटीस दिली होती काय ?

दिली असल्यास तामिली गोषवाऱ्याची प्रत, सदरील निकाल कोणता निकष लावून दिलेला आहे त्याची नक्कल, आरओआर प्रकरणातील रोजनामा लिहिल्याची सत्यप्रत, आरओआर जन माहिती अधिकारी यांच्या कक्षेत चालविण्यासाठी वरिष्ठांचे लेखी आदेश होते काय ? असेल तर त्याची सत्यप्रत आणि दिनांक ०७.०७.२००८ रोजी दिलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले आहे याबाबतची आपल्या अहवालाची सत्यप्रत, तसेच जन माहिती अधिकारी हे स्वतः शिकावू नायब तहसीलदार असताना संचिका क्रमांक २००८/जमा/सीआर-२२, दिनांक २३.१२.२००८ निकाल देता येतो का ? - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३.०२.२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने शासकीय कोषागारात दिनांक ०३.०३.२००९ रोजी केला. तथापि या शुल्काचा भरणा करुनही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १९.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०७.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नव्हते. प्रकरणात आज दिनांक १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १८.०३.२००९ पर्यंत कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे आयोगास आढळून येत असल्याचे अभिप्राय मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने व्यक्त केले होते.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही संमिश्र सवरुपाची आहे. यातील बऱ्याच मुद्दयावरील माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे खुलासे अपेक्षित करणारी मागितली आहे. अपिलार्थीस मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील -सदर निर्णयाच्या वेळी गैरअर्जदार यांना लेखी नोटीस दिली होती काय ? मुद्दा क्रमांक ४ मधील -आपल्या कक्षेत आरओआर चालविण्यासाठी वरिष्ठांचे लेखी आदेश होते काय ? व मुद्दा क्रमांक ६ बाबत - शिकाऊ नायब तहसीलदार असल्यामुळे प्रकरणात निकाल देतो का ? या मुद्दयांची माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीस उर्वरित माहिती - गैरअर्जदारास दिलेल्या लेखी नोटीशीची प्रत, निकाल देताना जन माहिती अधिकारी यांनी विचारात घेतलेले लेखी पुरावे, प्रकरणाच्या रोजनाम्याची सत्यप्रत, आरओआर चालविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या वरिष्ठांचे लेखी आदेश प्राप्त झाले असल्यास त्या लेखी आदेशाची प्रत - ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोघम असल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती आणि प्रत्यक्षात त्यांना देय असलेल्या माहितीचे पृथक्करण केले असता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट

केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपवेतो माहिती दिली नसल्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीपोटीचे भरलेले शुल्क रुपये ४ इतके त्यांना आता परत करावे लागतील. सबब अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ४ इतके त्यांना परत करावे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अपिलार्थीने अपेक्षिलेली माहिती खुलासे अपेक्षित करणारी असून संदर्भिय प्रकरण आर.ओ.आर.चे असल्याचे आयोगासमोर युक्तिवाद केला.

आज रोजी सनावणीच्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीबाबत आयोगाने नाराजी व्यक्त केली.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरवून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित तहसीलदार/नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

२. विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी (तहसीलदार/नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर) यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. साहेबराव पुंडलिकराव कराड, रा. चिखली, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५८९

सुनावणी दिनांक १९.११.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. वामन रंगनाथराव मोरे,<br>बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड,<br>परभणी | : | अपिलार्थी | :उपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था,<br>औरंगाबाद | | | :अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी | : | विभागीय उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : उपस्थित |
| त्रयस्थ पक्ष | : | दि परभणी पिपल्स नागरी बँक, श्री. श्रीपाद कुलकर्णी, परभणी तालुका सहकारी जिनिंग व प्रेसिंग सहकारी संस्था | :उपस्थित (संबंधित बँकेचे वकील- श्री.जी. बी. भालेराव) |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे माहिती मागितली होती. त्यामुळे संबंधित संस्थेकडून माहिती घेऊन अपिलार्थीस देणे त्यांना बंधनकारक होते. परंतु त्यांनी माहिती देण्याबाबत संबंधित संस्थेला कळविले व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांनी केलेले प्रथम अपील निबंधक सहकारी संस्था यांच्या दिनांक ०८.०२.२००६ च्या पत्राचा आधार घेऊन फेटाळून लावल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी गैरकायदेशीररित्या त्यांचे अपील फेटाळले असल्याकारणाने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद करुन त्यांनी या प्रकरणी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती कली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दि परभणी पिपल्स नागरी बँक, परभणी संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - परभणी तालुका सहकारी जिनिंग व प्रेसिंग सहकारी संस्थेच्या मालकीची रिकामी जागा दि परभणी पिपल्स नागरी बँक, परभणीकडे तारण दिलेली होती काय ? या तारण जमिनीची विक्री करण्यासाठी सहकार खात्याकडून परवानगी घेतली आहे काय ? किंवा त्यांना ही परवानगी दिली आहे काय ? दि परभणी पिपल्स नागरी बँक, परभणीने जागेची किंमत ८० लाख रुपये - कर्ज ५ कोटी दिले आहे हे खरे आहे काय ? जमिनीच्या किंमतीपेक्षा पाचपट कर्ज जास्त देणे हे नियमानुसार बरोबर आहे काय ? या कर्ज वाटपासाठी माजी कार्यकारी अधिकारी श्री. श्रीपाद कुलकर्णी हे जबाबदार आहेत काय ? जमीन तारण ठेवली असताना ती जमीन प्लॉट पाडून त्याची कर्ज घेणा-याने विक्री करुन बँकेची फसवणूक केली आहे

काय?, तारण जमिनीच्या व्यवहाराबाबत अवसायक प्रशासक यांनी बँकेच्या फसवणुकीबाबत चौकशी केली आहे काय ? तारण जमीन कर्जदाराने परस्पर विक्री केली तर कायद्यानुसार गुन्हे दाखल केलेले आहेत काय, - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८.०५.२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे अवसायक दि परभणी पिपल्स को ऑप. बँक, परभणी यांना कळविले. बँकेने त्यांच्या दिनांक ०८.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत देता येणे शक्य नसल्याचे कळविले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १३.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.०८.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०७.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी, अनुपस्थित होते व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष दि.परभणी पिपल्स को.ऑप.बँक लि.चे वकील उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

अपिलार्थी यांनी मागील सुनावणीच्या वेळी केलेला युक्तिवाद कायम ठेवून असे प्रतिपादन केले की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत सहकार खात्याचे संबंधित नागरी बँक आणि सहकारी जिनिंग प्रेसवर नियंत्रण आहे. त्यामुळे त्यांना ही माहिती, माहिती अधिकाराखाली जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे त्यांना अपेक्षित आहे. त्यांना जन

माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.०६.२००९ रोजीची तारीख टाकून उशिरा माहिती दिली असल्यामुळे सहायक निबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्यावर शास्ती लादण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती बँकेच्या संबंधात असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज संबंधित बँकेकडे पाठवून दिला.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीबाबत आयोगाने नाराजी व्यक्त केली.

त्रयस्थ पक्षाचे उपस्थित वकील श्री. जी. बी. भालेराव यांनी असा युक्तिवाद केला की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी त्यांच्या बँकेस मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार लागू होत नसल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, नागरी सहकारी बँकेला शासनाकडून कोणताही वित्तपुरवठा व अनुदान प्राप्त होत नाही. त्यांची संस्था ही कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होत नसल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागविली आहे त्या त्रयस्थ पक्षाच्या संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेली आहे. या संस्थेवर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे नियंत्रण असते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी तथा विभागीय उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, संबंधित बँकेकडून त्यांच्या कार्यालयास नियमित प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या, ज्यामध्ये

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा समावेश असेल, अशा प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा विभागीय उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी संबंधित बँकेकडून त्यांच्या कार्यालयास नियमितपणे प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या, ज्यामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा समावेश असेल, अशा प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. वामन रंगनाथराव मोरे, बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३१९

सुनावणी दिनांक: १९.११.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. बशिरखान हाजीरखान,<br>शिवशंकर गृहनिर्माण संस्था, ३०/१,<br>शिवाजीनगरजवळ, औरंगाबाद | : | अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप निबंधक, सहकारी संस्था, तालुका कार्यालय,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी | :उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | | | :उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| त्रयस्थ पक्ष | : | १.शिवशंकर गृहनिर्माण संस्था मर्या. | :अनुपस्थित |
| | | २.श्री. एस. बी. सोनटक्के | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे मूळ दि. १८.०३.२००८ रोजीचे द्वितीय अपील दिनांक २८.०५.२०१० रोजी फेरसादर केले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २६.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, शिवशंकर गृहनिर्माण संस्था, औरंगाबाद ही संस्था स्थापन झाल्यापासून सन १९९१ ते २००७ पर्यंत अपिलार्थी हे या संस्थेचे चेअरमन होते काय त्यांचा कार्यकाळ देण्याबाबत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९.१०.२००७ रोजीच्या प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संस्थेचे रेकॉर्ड न मिळाल्यामुळे कोणत्या चेअरमनचा किती कालावधी आहे याबाबत माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीस सदर माहिती देताना हाजीखॉन बशीरखॉन या नावाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे. प्राप्त माहितीवर समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०७.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस यानंतर दिनांक ३०.१२.२००७ रोजी पोस्टाने माहिती पाठविली. तथापि यानंतरही अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०७.०७.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष श्री. एस.बी.सोनटक्के उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३.०७.२०१० रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने ज्या संस्थेच्या

अध्यक्षाची सन १९९१ पासूनची माहिती मागितली आहे त्या संस्थेची यादी अपिलार्थीस दिनांक ३०.१२.२००७ रोजी पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी  दि. ०७.०७.२०१० रोजी अपिलार्थीने पुनश्च् व्यक्तिशः माहिती हस्तगत केल्याचा आयोगासमोर युक्तिवाद करुन यासंदर्भात अपिलार्थीची पोचसही आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केली.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. बशिरखान हाजीरखान, शिवशंकर गृहनिर्माण संस्था, ३०/१, शिवाजीनगरजवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५९१
सुनावणी दिनांक: १९.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मनोहर रामसिंग बर्तुने,<br>रा. संत तुकाराम हॉस्टेलजवळ, मोची गल्ली, घर<br>क्र. ५-११-५२, पदमपुरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी :उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>महानगरपालिका, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>महानगरपालिका, औरंगाबाद | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| १.जन माहिती अधिकारी : | प्रशासकीय अधिकारी,<br>महानगरपालिका, औरंगाबाद | :उपस्थित |
| २.जन अपिलीय अधिकारी : | उपायुक्त (सिडको),<br>महानगरपालिका, औरंगाबाद | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही व संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अरेरावीची भाषा केली व तीन दिवसाच्या आत माहिती देतो असे म्हणून १५ दिवस अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात रोज जाणे येणे करण्यास भाग पाडले व अपिलार्थीचा शारीरिक व मानसिक छळ केल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७.०९.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे, दिनांक २१.०६.२००६, २७.०६.२००६, ०१.०७.२००६ व २१.०७.२००६ च्या अर्जांवर संबंधित अधिकारी (जे.ई.) यांनी काय कार्यवाही केली त्यांची संपूर्ण माहिती, या कालावधीत पदमपुरा विभागामध्ये कोण जे.ई. काम करत होते त्याचे नाव व मिठ्ठू देवमन जैस्वाल राहणार पदमपुरा, घर नं. ५-११-५३ च्या घराचे बांधकाम परवानगीची सत्यप्रत, अशी माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६.१०.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.११.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती ३ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते आणि अपिलार्थी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सहायक आयुक्त आस्थापना १, प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद व सहायक संचालक, नगर रचना यांच्याकडील उप अभियंता श्री. ए.

बी. देशमुख यांच्याकडे उपलब्ध होती. त्यांनी या संदर्भात सहायक आयुक्त, आस्थापना १ व सहायक संचालक, नगर रचना विभाग यांना त्यांच्याकडील दिनांक ३१.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे व सहायक आयुक्त, आस्थापना विभाग १ यांना दिनांक १२.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. तथापि संबंधितांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे अपिलार्थीस ते माहिती देऊ शकले नाहीत.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये जन माहिती अधिकारी म्हणून प्रशासकीय अधिकारी यांची नेमणूक झालेली आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती प्रशासकीय अधिकाऱ्याकडे उपलब्ध नव्हती, ती सहायक आयुक्त आस्थापना १, प्रशासकीय अधिकारी व सहायक संचालक, नगर रचना कार्यालयातील उप अभियंत्याशी संबंधित होती. त्यामुळे या प्रकरणी प्रशासकीय अधिकाऱ्याने अपिलार्थीचा दिनांक ०७-०९-२००९ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे या अर्जाची प्रत सहायक आयुक्त, आस्थापना-१ व सहायक संचालक, नगर रचना यांच्याकडे पाच दिवसाच्या आत पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती या कालावधीमध्ये केली नाही. यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त यांच्याकडे या संदर्भात दिनांक २६.१०.२००९ रोजी प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी सहायक आयुक्त, आस्थापना १ यांना दिनांक ३१.१०.२००९ रोजी व १२.११.२००९ रोजी आणि सहायक संचालक, नगर रचना विभाग यांना दिनांक ३१.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज पाठविला. आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती पुरविली याची आयोगाने विचारणा केली असता, प्रशासकीय अधिकाऱ्याने आयोगाकडे त्यांनी

युक्तिवादामध्ये संदर्भीत केलेल्या पत्राच्या प्रती सादर केल्या. या पत्राच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिल्या आहेत. परंतु या पत्रांचे अवलोकन करता या एकाही पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप इतके मर्यादित होते की, ही माहिती अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देण्याची कोणतीही अडचण उद्‌भवू शकली नसती. आज रोजी सुनावणीच्या वेळी प्रशासकीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील पदमपुरा विभागामध्ये कार्यरत असलेल्या जे. ई. च्या नावाची माहिती सहायक आयुक्त आस्थापना १, श्री. आयुब खान यांच्याकडे उपलब्ध होती. अपिलार्थीने दिनांक २१.०६.२००६, २७.०६.२००६, ०१.०७.२००६ व २१.०७.२००६ च्या अर्जांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती प्रशासकीय अधिकारी म्हणून त्यांच्याकडे उपलब्ध होती आणि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मिठ्ठू देवमन जैस्वाल यांच्या घराच्या बांधकामाबाबतची प्रत श्री. ए. बी देशमुख, उप अभियंता, सहायक संचालक, नगर रचना कार्यालय, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे उपलब्ध होती. ही माहिती अपिलार्थीस न देण्याचे कोणतेही समर्थनीय कारण प्रशासकीय अधिकाऱ्यांना आयोगासमोर देता आले नाही. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नावर २४ तासाच्या आत कार्यवाही करतो असे त्यांनी आयोगास आश्वासित केले आहे. अपिलार्थीच्या अर्जावर २४ तासात कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी जरी आयोगास आश्वासित केले असले तरीही या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आणि सार्वजनिक स्वरुपाची होती व सार्वजनिक स्वरुपाची माहिती असूनही ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे पूर्णपणे अपयशी ठरले असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास प्रथम प्रतिसाद देताना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम

६ (३) (एक) व ७ (१) मधील तरतुदीचा भंग केल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित इतर जन माहिती अधिकारी, श्री. आयुब खान,सहायक आयुक्त व श्री. ए. बी. देशमुख उप अभियंता हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. श्री. आयुब खान, सहायक आयुक्त आस्थापना १, श्री. शिवाजी बाबूराव झनझन तत्कालीन प्रशासकीय अधिकारी व श्री. ए. बी. देशमुख तत्कालीन उप अभियंता यांना त्यांच्या बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देय असताना ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी टाळाटाळ केल्याने त्यांच्यावर एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा. या कालावधीमध्ये त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांनी उपरोक्त प्रकरणी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती सर्व संबंधितांच्याकडून घेऊन, एकत्रित करुन नंतर ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व शीघ्र टपालाद्वारे पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचा युक्तिवाद केला तर अपिलार्थीची त्यांना माहिती मिळाली नसून माहितीची मागणी कायम असल्याची आग्रही भूमिका असल्याचे आयोगाचे निदर्शनास आले.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या माहितीशी संबंधित नस्ती अपिलार्थीस व्यक्तिशः पाहण्याची व त्यामधून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य व व्यक्तिशः हस्तांतरित करण्याची व्यवस्था करावी.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त होण्याच्या दृष्टीने, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कार्यालयात संबंधित नस्ती पाहण्याची व त्यामधून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरित करण्याची व्यवस्था करावी.

३. श्री. आयुब खान, सहायक आयुक्त, श्री. शिवाजी बाबुराव झनझन,तत्कालीन प्रशासकीय अधिकारी व श्री. ए. बी. देशमुख,उपअभियंता यांना एकूण ` २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी, हीच कारणे दाखवा नोटीस समजून, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मनोहर रामसिंग बर्तुने, रा. संत तुकाराम हॉस्टेलजवळ, मोची गल्ली, घर क्र. ५-११-५२, पदमपुरा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकत टपालाद्वारे)

३. श्री. आयुब खान, सहायक आयुक्त,आस्थापना-१, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकत टपालाद्वारे)

४. श्री. ए.बी.देशमुख, उपअभियंता, सहायक संचालक, नगररचना कार्यालय,महानगर पालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकत टपालाद्वारे)

५. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५९२

सुनावणी दिनांक १९.११.२०१०

१ श्री. समाधान माणिक शेवाळे, : अपिलार्थी : :उपस्थित

रा. मु. पद्मावती, पो. वालसावंगी, ता. भोकरदन,

जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी :

तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,

भोकरदन, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जि. जालना

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, हसनाबाद, :अनुपस्थित

ता. भोकरदन, जि. जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. डी. तराळ (कृषि सहायक) :अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०८.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, आर. व्ही. टी. रोजगार हमी योजना, मराठवाडा पाणलोट मिशन /

नदी खोरे योजनेअंतर्गत श्री. डी. डी. तराळ हे कार्यालयात कार्यरत असल्यापासूनच्या कालावधीपासून ते दिनांक २१.११.२००८ पर्यंतच्या कालावधीतील श्री. डी. डी. तराळ यांनी केलेल्या विविध कामाचे अंदाजपत्रकाच्या, हजेरीपत्रकाच्या, मापन पुस्तिकेच्या व लेबर रिपोर्टच्या सत्यप्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत व मोठी असल्यामुळे ही माहिती काढण्यासाठी वेळ लागेल असे अपिलार्थीस अवगत केले व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले असल्यामुळे, त्यांनी माहिती अधिकाऱ्याकडे सादर केलेल्या दारिद्र्यरेषेखालच्या प्रमाणपत्रावर सक्षम अधिकाऱ्याने साक्षांकित केलेल्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत सादर करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अन्यथा अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे त्यांना नियमानुसार शुल्क चलनाद्वारे भरावे लागेल, याची अपिलार्थीस कल्पना दिली. अपिलार्थीस सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अंडर सर्टिफीकेट ऑफ पोटिंगद्वारे दिनांक १७.१२.२००८ रोजी पाठविले आहे. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २५.०५.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.०६.२००९ रोजी अपिलकार हे दारिद्र्यरेषेखालील असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी झेरॉक्स प्रतिकरिता लागणाऱ्या खर्चाची मागणी करुन, निधी प्राप्त होताच माहिती उपलब्ध करुन द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील, त्रयस्थ पक्ष, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्यावेळी अपिलार्थीचे वकील श्री. आर. एम. जाधव यांनी असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २१-११-२००८ रोजीच्या अर्जाबरोबर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असलेल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. तथापि ही झेरॉक्स प्रत साक्षांकित करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेचे दिनांक १५.१२.२००८ रोजीचे कथित पत्र त्यांना प्राप्त झाले नाही. यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी हे माहिती देतील या अपेक्षेने वाट पाहिली व त्यानंतर दिनांक २५.०५.२००९ रोजी तालुका कृषि अधिकारी, भोकरदन यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९.०६.२००९ रोजी सुनावणी ठेवूनही ते सुनावणीसाठी गैरहजर राहिले. या प्रकरणी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी वारंवार उपस्थित राहिले. तथापि त्यांना संबंधितांनी कोणतीही माहिती दिलेली नाही. या युक्तिवादापृष्ठ्यर्थ आयोगाने अपिलार्थी यांच्याकडे, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहिल्याचा एखादा सबळ पुरावा आयोगास सादर करु शकतात किंवा कसे अशी विचारणा केली असता त्यांना, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः उपस्थित राहिल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगास सादर करता आला नाही. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत जोडलेले त्यांचे दारिद्र्यरेषेखालचे प्रमाणपत्र हे सांक्षांकित नसल्यामुळे या प्रमाणपत्राची वैधता त्यांना संशयास्पद वाटली. त्यामुळे या प्रमाणपत्राची सत्यता पडताळण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रमाणपत्राची प्रत

साक्षांकित स्वरुपात मागितली. अपिलार्थीने जरी या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असली तरीही ही माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झालेले नाहीत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दारिद्र्यरेषेच्या प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत त्यांच्याकडील दिनांक १५.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथमतः कल्पना दिली. तदनंतर दिनांक ०६.०४.२००९ रोजी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या रकमेइतके अनुदान त्यांनी जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६.०४.२००९ रोजी मागितले. तथापि हे अनुदान त्यांना आजतागायत उपलब्ध होऊ शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून, ही माहिती अपिलार्थीस ते सशुल्क देण्यासाठी तयार आहेत.

मागील सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांचे दारिद्र्यरेषेचे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन सादर करण्याच्या सूचना अपिलार्थीस दिल्या आहेत. तथापि या नंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कोणतीही कार्यवाही केली नाही. या संदर्भात अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १५.१२.२००८ रोजीचे पत्र प्राप्त झाले नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविल्याचा सबळ पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः उपस्थित राहिल्याचा कोणताही सबळ पुरावा उपलब्ध नाही व या प्रकरणी त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दिनांक २५.०५.२००९ रोजी

म्हणजेच, अधिनियमातील कलम १९ (१) मध्ये विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर केले आहे. तसेच या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना प्रथम अपील करण्यासाठी लागलेल्या विलंबाचे समर्थन केले नसल्यामुळे अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५.०५.२००९ रोजी केलेले प्रथम अपील अर्ज अवैध असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील वेगवेगळ्या तरतुदीचा अशाप्रकारे भंग केला आहे. तरीही अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी प्रथमतः त्यांचे दारिद्र्यरेषेखालचे वैधता प्रमाणपत्र सादर करावे व यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती निधीच्या उपलब्धतेनुसार, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी .

आज रोजीच्या सुनावणीच्यावेळी कोणतीही नवीन बाब आयोगासमोर मांडण्यात आली नाही.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती निधीच्या उपलब्धतेनुसार अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. समाधान माणिक शेवाळे, रा. मु. पद्मावती, पो. वालसावंगी, ता. भोकरदन, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, हसनाबाद, ता. भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५९३

सुनावणी दिनांक १९.११.२०१०

१ श्री. मासुलदार महंमद महेताबसाब, : अपिलार्थी :उपस्थित

मु. पो. चाकूर (पेट मोहल्ला), ता. चाकूर, जि. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी :अनुपस्थित

ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत चाकूर, जि. लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा

गट विकास अधिकारी, पंचायत समिती चाकूर, जि. लातूर

आज रोजी प्रत्यक्षात :

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), :अनुपस्थित

पंचायत समिती चाकूर, जि. लातूर

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, वस्तीवाड अंगणवाडी प्रस्ताव मंजूरीची कागदपत्रे व बांधकाम परवाना व कोणत्या गटाचा आदेश आहे किंवा नोटीफिकेशन याबाबतच्या आणि गटाच्या

मालकीच्या कागदपत्राच्या प्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने माहितीसाठीचा हा अर्ज करताना त्यामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाद्वारे माहिती अपेक्षित आहे याचा कोणताही उल्लेख केला नव्हता. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्याने दिनांक ०१.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना कोणत्या माध्यमाद्वारे माहिती अपेक्षित आहे हे कळविण्याचे सूचित केले व दिनांक २४.०७.२००९ रोजी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली. तथापि ही माहिती प्राप्त न झ ाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०१.०८.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४.०९.२००९ रोजीच्या आदेशान्वये निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य व तात्काळ माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४.०९.२००९ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले व वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील व आजच्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही व जी माहिती प्राप्त झाली ती विलंबाने प्राप्त झाल्याचे आयोगास अवगत केले.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीने या प्रकरणी ज्या वस्तीवाड शाळेच्या संदर्भात माहिती मागविली आहे त्या शाळेच्या बांधकामासंदर्भात व भूखंड मालकी संदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०६.११.२००९ रोजी

व्यक्तिशः माहिती पुरविली असून, ही माहिती प्राप्त झाल्याची पोच अपिलार्थीने त्यांच्याकडे दिली आहे. यापूर्वी देखील त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४.०७.२००९ रोजी माहिती दिली होती.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळीचे युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाद्वारे माहिती अपेक्षित आहे याचा उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७.०६.२००९ रोजीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१.०७.२००९ व २३.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपेक्षित प्रतिसाद दिला आहे. मूळात अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मोघम स्वरुपात माहिती मागितली आहे. वस्तीवाड अंगणवाडी म्हणजे कुठली अंगणवाडी त्या स्थळाचा आणि ज्या गटाच्या संबंधित माहिती अपिलार्थीस अपेक्षित आहे त्या गट क्रमांकाचा उल्लेख अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही आवश्यक त्या तपशीलाअभावी मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत असल्याने व या उपर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली वस्तीवाड शाळेच्या सर्व कागदपत्राच्या प्रती दिनांक ०६-११-२००९ रोजी व्यक्तिशः हस्तांतरित केल्या असल्यामुळे व त्याची पोच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. मासुलदार महंमद महेताबसाब, मु. पो. चाकूर (पेट मोहल्ला), ता. चाकूर, जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत चाकूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती चाकूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५९४

सुनावणी दिनांक १९.११.२०१०

१ श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, : अपिलार्थी : :अनुपस्थित
रा. उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी :
आगार प्रमुख (क),
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ उदगीर,
जि.लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
विभाग नियंत्रक, (प्रतिनिधी - श्री. एम.एस.भानप, विभागीय वाहतुक अधिकारी)
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
विभागीय कार्यालय, लातूर

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : आगार व्यवस्थापक (वरिष्ठ), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ उदगीर,जि.लातूर :उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे

प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील व आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दि. २१.०७.२००९ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांनी एकूण २४४ पृष्ठांची माहिती टपालाद्वारे पुरविली. अपिलार्थीस टपालाद्वारे माहिती पुरविण्यासाठी त्यांना आलेल्या पोस्टाच्या रु.९६/- च्या खर्चासह या प्रकरणी एकूण रु. ५८४/- इतकी रक्कम खर्च करावी लागली.

मागील सुनावणीच्यावेळी अपिलार्थीने मागणी केलेली व अपिलार्थीस देय असलेल्या माहितीचे केलेले पृथक्करण करुन, मुद्दा क्र.६ व १२ शी संबंधित माहिती अपिलार्थीस आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी, या आदेशानुसार मुद्दा क्र. ६ व १२ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.०७.२०१० रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले व त्यासंदर्भातील पोस्टाचा दाखला आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केला.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : १९.११.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे,रा.शिवगण निवास, सत्ताने निवाससमोर, बिदर

रोड,मु.पो. उदगीर, जि.लातूर-४१३५१७

२. जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक (वरिष्ठ), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिली अधिकारी तथा विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५९५

सुनावणी दिनांक १९.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. वाघमारे प्रकाश ग्यानोबा,<br>रा.गोकुंदा, ता.किनवट,जि.नांदेड | : अपिलार्थी | :अनुपस्थित |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>महाव्यवस्थापक,<br>जिल्हा उद्योग केंद्र,नांदेड | : प्रतिवादी | :उपस्थित<br>(प्रतिनिधी - श्रीमती विजया अस्थाना, व्यवस्थापक ) |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिक्षकीय उद्योग अधिकारी,<br>उद्योग संचालनालय कार्यालय,उपविभागीय कार्यालय,नांदेड | | :उपस्थित<br>(प्रतिनिधी - श्रीमती विजया अस्थाना, व्यवस्थापक ) |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मागील सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या दि. ०६.०७.२०१० रोजीच्या पत्राची सत्यप्रत आयोगास सादर केली असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी या प्रकरणाशी

संबंधित मागणी केलेली माहिती दि. ०६.०७.२०१० रोजी प्राप्त झाल्याचे कबूल केले असून विचाराधीन अपील निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामुळे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्यामुळे आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. वाघमारे प्रकाश ग्यानोबा,रा.दत्तनगर,गोकुंदा, ता.किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षकीय उद्योग अधिकारी,उद्योग संचालनालय कार्यालय,उपविभागीय कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५९६

सुनावणी दिनांक १९.११.२०१०

१ श्री· शेख मोहंमद शेख सईद (चाऊस), : अपिलार्थी :अनुपस्थित

रा.किनवट,जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी

कृषि विभाग कार्यालय,किनवट,

जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा :अनुपस्थित

तालुका कृषि अधिकारी, किनवट

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, बोधी (बु.), :अनुपस्थित

ता.किनवट,जि.नांदेड

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे.आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६-०९ या कालावधीतील मराठवाडा पाणलोट क्षेत्र विकास आणि शेततळे या योजनेअंतर्गत किनवट तालुक्यामध्ये केलेल्या कामासंदर्भात कामाचे स.नं., ग.नं., शेतकऱ्याचे नाव, मंजूर निधी व झालेला खर्च, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१२.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या

माहितीपोटीचे शुल्क रु. २३२०/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले. परंतु अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेचे पालन न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दि. २६.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी , जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस प्रथम त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे त्यांच्या दि. १२.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले होते. तथापि यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे जन माहिती अधिकारी यांना सांगितल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस दि. ०५.१०.२००९ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य दिली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीची त्यांना विचाराधीन प्रकरणाशी संबंधित माहिती प्राप्त झाल्याची पोचसही आयोगास सादर केली. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०५.१०.२००९ रोजी माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नव्हते.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे दि.०१.१०.२००९ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीस

आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाली आहे आणि माहिती प्राप्त झाल्याची पोचसही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिली आहे, हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

.**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : १९.११.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शेख मोहंमद शेख सईद (चाऊस),साईनगर, ता.किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,बोधी (बु.),ता.किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५९७

सुनावणी दिनांक १९.११.२०१०

१ श्री. शंकर संगोजी बुरकुले, : अपिलार्थी :उपस्थित

रा.इमामवाडी, ता.कंधार,जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,घोडेगाव,

ता.आंबेगाव,जि.पुणे.

२ जन अपिलीय अधिकारी तथा,

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,घोडेगाव,

ता.आंबेगाव,जि.पुणे.

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी | : | सहायक प्रकल्प अधिकारी,<br>एकात्मिक बाल विकास<br>प्रकल्प,घोडेगाव,ता.आंबेगाव,जि.पुणे. | : उपस्थित |
| जन अपिलीय अधिकारी | : | प्रकल्प अधिकारी,<br>एकात्मिक बाल विकास प्रकल्प,<br>घोडेगाव,ता.आंबेगाव,जि.पुणे. | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी स्वयंपाकी या पदासाठी दि. २२.०२.२००९ रोजी घेतलेल्या परीक्षेसंदर्भात एकूण ६७ उमेदवारांची लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींची मागणी व्यक्तिशः केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याच्या कारणास्तव यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २७.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प,घोडेगाव,ता.आंबेगाव,जि.पुणे यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०९.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड केल्यास माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम 8(1)(e) च्या तरतुदींचा भंग होणार असल्याचे आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, सार्वजनिक हिताचा कोणताही उद्देश नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्याकडे माहितीची मागणी केली, त्यावेळी सदरचे प्रकरण मॅट (M.A.T.)मध्ये प्रलंबित असल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत.आज

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी मॅट न्यायालयाने अपिलार्थीचे प्रकरण फेटाळल्यासंदर्भातील निर्णयाची प्रत आयोगास सादर केली.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी ज्या स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे, त्या स्वरुपाची माहिती अपिलार्थीस उघड न करण्याची भूमिका आयोगाने वेळोवेळी वेगवेगळया प्रकरणांमध्ये घेतली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०९.२००९ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता, या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्याचे प्रयोजन आयोगास आढळून येत नाही.

सबब आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शंकर संगोजी बुरकुले,मु.इमामवाडी, पो.ता.कंधार,जि.नांदेड-४३१ ७१४

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी,एकात्मिक बाल विकास प्रकल्प,घोडेगाव,ता.आंबेगाव,जि.पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिली अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,एकात्मिक बाल विकास प्रकल्प,घोडेगाव,ता.आंबेगाव,जि.पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६२४

सुनावणी दिनांक १९.११.२०१०

१ श्री. पाटील मधुकर पंडितराव, : अपिलार्थी : :अनुपस्थित
रा. रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परंडा,
तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी :उपस्थित
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परंडा,
तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : लिपीक, नगर परिषद कार्यालय, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद :उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रातील म्युनिसिपल घर क्रमांक १०/१७ समोर

झालेल्या दोन मजली इमारतीच्या बांधकामाच्या परवान्याची प्रत, नकाशाच्या नकला व जाहीर प्रगटनाची नक्कल आणि अपिलार्थीच्या दिनांक २०.११.२००० च्या कागदाच्या प्रती अशी माहिती साक्षांकीत करुन मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१.०८.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचा अपील अर्ज जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे केला होता. त्यांनी अपिलार्थीच्या अपिलाची प्रत मुख्याधिकारी, नगरपरिषद, परंडा यांच्याकडे पाठवून दिली. तथापि मुख्याधिका-याने या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १३.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, दिनांक २४-०८-२००९ रोजी माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले. तथापि सदरचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची पोचही घेतल्याचे अथवा यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी सदरचे पत्र अपिलार्थीस पोस्टाव्दारे पाठविले असल्याचा कोणताही सबळ पुरावा त्यांना आयोगास सादर करता आला नाही.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती, तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी जन माहिती

अधिकारी यांच्याशी संपर्क साधल्याचा कोणताही सबळ पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. त्याचबरोबर अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा कोणताही सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही हे पाहता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिनांक २०-११-२००० रोजी अर्ज केल्याचे अवगत केले. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे त्याचा बोध होत नाही. तसेच या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मध्ये अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-११-२००० रोजीच्या कागदाच्या प्रती अशी मोघम स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. तथापि अपिलार्थीस कागदाच्या प्रती म्हणजे निश्चित कोणत्या विषयावर व कोणत्या कागदाच्या प्रती हव्या आहेत याचा उलगडा होत नाही त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्दयावरील माहिती देखील मोघम स्वरुपाची असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही स्वयंस्पष्ट स्वरुपातील आणि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, आयोगाने दिलेल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस द्यावयाची माहिती देऊ केली तथापि अपिलार्थीने माहिती स्वीकारली नाही. त्यामुळे त्यांनी दि. २६.०८.२०१० रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे

अपिलार्थीस माहिती पाठविली आहे. यासंदर्भातील पोस्टाचा दाखला त्यांनी आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केला.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : १९.११.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. पाटील मधुकर पंडितराव, रा. रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद कार्यालय, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५७६
सुनावणी दिनांक १९-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम,<br>रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट<br>ईतवारा, नांदेड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अपर कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय,<br>नांदेड | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार<br>कार्यालय, नांदेड | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील १६ तालुक्यातील उप कोषागार अधिकारी यांच्या मूळ सेवापुस्तकाच्या प्रती, त्यांचे गोपनीय अहवाल, शैक्षणिक पात्रता, जातीचे प्रमाणपत्र, प्रवेश निर्गम उतारा, जात पडताळणी प्रमाणपत्र, पगारपत्रक, त्यांची नावे व पत्ते व संबंधित उप कोषागार अधिकारी सेवेत कधीपासून रुजू झाले याची सविस्तर माहिती, अशी माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६९४ इतके जिल्हा कोषागार कार्यालयामध्ये भरण्याचे कळविले. तथापि यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड यांच्याकडे यासंदर्भात दिनांक २३-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०२-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देऊ केली, तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात त्यांनी सूचित केल्याप्रमाणे न भरल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही असा युक्तिवाद केला. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नव्हते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक २२-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जास दिनांक १८-०६-२००९ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदीप्रमाणे संपूर्ण तपशील देऊन अपिलार्थीस कळविले. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य कलम ७ (१) व ७ (३) (क) प्रमाणे पार पाडल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीने अधिनियमातील कलम ७ (५) मधील तरतुदीमध्ये विहित केलेले त्यांचे कर्तव्य मात्र पार पाडले नाही. अशा प्रकारे अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे माहिती न मिळण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नाहीत असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे त्यांना या प्रकरणी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे कलम ७ (५) मधील तरतुदीप्रमाणे भरणे अनिवार्य होते. या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सूचनेप्रमाणे केला नाही. त्यामुळे अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती विनामूल्य देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सादर केले की, अपिलार्थीने माहितीपोटीचे शुल्क भरले नाही त्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील फेटाळण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| **औरंगाबाद** | | **( दी. बा. देशपांडे )** |
| **दिनांक** | **१९-११-२०१०** | **राज्य माहिती आयुक्त** |
| | | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा अपर कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५७८

सुनावणी दिनांक १९-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महंमद शरीफ महंमद इब्राहीम,<br>रा. बरकतपूरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर,<br>जिल्हा नांदेड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत<br>कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर,<br>जिल्हा नांदेड | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन अपिलीय अधिकारी | : | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर यांच्याकडे, अर्धापूर ग्रामपंचायतीसंबंधी काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १४-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०८-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक १५-०९-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०९-२००९ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविली. तथापि माहिती प्राप्त होऊनही अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही स्वतः माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०८-२००९ रोजी दिलेल्या निर्णयान्वये त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०९-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याची पोच आयोगास सादर केली. यावरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०९-२००९ रोजी पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे दिनांक १०-०९-२००९ रोजी पुरविली आहे. ही माहिती प्राप्त झाल्याची लेखी कबूली अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती त्यांनी माहिती अधिका-याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे सकृतदर्शनी आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील देय माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली असल्याने आणि या माहितीवर अपिलार्थीने त्यांचे कोणतेही अभिप्राय आयोगाकडे लेखी स्वरुपात नोंदविले नसल्याने अथवा यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील त्यांना आवश्यक ती देय माहिती त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील करण्यापूर्वीच प्राप्त झाल्याचे सिध्द होत असल्यामुळे, फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सादर केले की, त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे व अपिलार्थीने त्यांना माहिती मिळाल्याबाबतची पोच दिली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १९-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महंमद शरीफ महंमद इब्राहीम, रा. बरकतपूरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५७९

सुनावणी दिनांक १९-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शामराव जयराम गायकवाड,<br>रा. भवन, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय<br>कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्रीमती पार्वताबाई कडुबा कळम व इतर तीन यांनी श्री. बाबुराव जयराम गायकवाड व इतर चार लोकांविरुध्द मौजे चिंचखेडा येथील जमीन विक्रीबाबत प्रकरणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या अपील अर्जाच्या संदर्भात किती तारखांना सुनावणी झाली आणि कोणत्या तारखेस अर्जदार व गैरअर्जदार हजर आणि गैरहजर राहिले, सदरील प्रकरणाचा निर्णय झाला आहे की निर्णयासाठी प्रकरण राखून ठेवण्यात आले आहे आणि या प्रकरणाचा निकाल लागला असल्याचे व प्रकरण बंद केले असल्याचे दोन्ही पक्षाच्या पक्षकारांना लेखी कळविले आहे काय, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६० इतके चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. या प्रकरणी अपिलार्थीने शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ६ पृष्ठांची माहिती

दिली. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०८-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत प्रथम दिलेली माहिती दिली असल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०२-२००९ रोजी या प्रकरणी अपिलार्थीस देय असलेली माहिती दिली आहे. अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने ज्या प्रकरणासंदर्भात त्यांच्याकडे माहिती मागितली होती त्या अर्जाच्या ज्या सुनावण्या झाल्या त्या दिवसांच्या रोजनाम्याच्या प्रती आणि या प्रकरणात तहसीलदाराने दिलेले आदेश या प्रती अपिलार्थीस पुरविल्या आहेत. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याची पोच देखील त्यांनी दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या माहितीची मागणी केली आहे त्या माहितीपैकी अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या अपील सुनावणी तारखा आणि झालेल्या सुनावणीच्या रोजनाम्याच्या प्रती एवढीच माहिती त्यांना जन माहिती अधिका-याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतीही माहिती मागितली नाही. याच अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ व्दारे अपिलार्थीने "सदर प्रकरणाचा निर्णय लागला आहे की त्यांनी प्रकरण निर्णयासाठी राखून ठेवले आहे आणि सदरील प्रकरण बंद केल्याचे दोनही बाजूच्या पक्षकारास कळविले आहे काय" या भागावरील विचारलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिका-याकडून देय होत नाही. कारण ही माहिती अधिनियमा-तील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे आणि ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही आणि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित संपूर्ण आणि मुद्दा क्रमांक ४ मधील निकालाच्या प्रमाणित प्रती ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही ६ पृष्ठांची माहिती अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे प्रमाणित करुन दिली असल्यामुळे या प्रमाणित प्रतीचा दर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने प्रतिपृष्ठ १० रुपये असा ठरविला असल्यामुळे आणि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी

यांच्याकडे केला असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणे बाकी नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी कसूर केल्याचे आयोगास आढळून येत नाही. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १९-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव जयराम गायकवाड, रा. भवन, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५८१

सुनावणी दिनांक १९-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अनिल किसन अक्कर,<br>मु. पो. भराडी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,<br>भराडी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : प्रतिवादी : | उपस्थित-<br>तत्कालीन<br>व सध्याचे |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती<br>कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड,<br>जिल्हा औरंगाबाद | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेशी संबंधित सन २००३ ते दिनांक १६-०६-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये शाळेला आलेला निधी किती?, शाळा दुरुस्तीसाठी आलेला निधी, व तो कसा खर्च करण्यात आला, कामाचे अंदाजपत्रक, सी. एस. टी. बी. एस. टी. बील पावत्यांच्या सत्यप्रती, भंगार विकताना वरिष्ठांची परवानगी घेतली आहे का, घेतली असल्यास पत्राची सत्यप्रत, सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत झालेल्या वस्तीशाळा बांधकामाचे अंदाजपत्रक, सी. एस. टी. बी. एस. टी. बिलाच्या पावत्याची सत्यप्रत आणि २००३ पासून दिनांक १६-०६-२००९ पर्यंत शालेय समितीच्या झालेल्या ठरावाच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

या नंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २२-०७-२००९ रोजी गट शिक्षणाधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे ही माहिती वेळेत प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी

दिनांक १८-०९-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०७-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नसल्याचा पुनरुच्चार करुन त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ७ वर्षाची असल्यामुळे, ही माहिती एकत्रित करण्यासाठी त्यांना वेळ लागला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे (पाठपोट पृष्ठांची संख्या ११४ इतकी) तयार असून ते अपिलार्थीस ती विनामूल्य देण्यास तयार आहेत. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०७-२०१० रोजी स्वत: होऊन देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले आणि ती आयोगाच्या समोरच स्वीकृत करण्याबाबत विचार केला जाईल, असे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने सुनावले.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीपैकी "ज्या जुन्या खोल्या तोडण्यात आल्या त्यांचे निघालेले भंगार विकले असेल तर वरिष्ठांची परवानगी घेतली होती का? " या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण मागितले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण व कारणे विचारणे आणि जन माहिती अधिकाऱ्याने अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व स्पष्टीकरण देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली होती. त्यामुळे आयोगाने अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी गेले होते, याचा सबळ पुरावा मागितला असता, अपिलार्थी सदर पुरावा आयोगास दाखवू शकले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही, हा त्यांचा मुद्दा आयोग अग्राह्य धरत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आजही तयार आहे व ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी

तयार आहेत. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यांना वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली माहिती, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कोणतीही नवीन बाब आली नाही. आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १९-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनिल किसन अक्कर, मु. पो. भराडी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भराडी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, सिल्लोड,जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५८२

सुनावणी दिनांक १९-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मधुकर भावराव चौंधे,<br>रा. मधुबन निवास, प्लॉट नं. १०, सर्वे न. १८०/४<br>साफल्य नगर, ऑडीटर सोसायटीच्या मागे, जळगाव<br>टी पॉइंट, हर्सुल, औरंगाबाद | : अपिलार्थी : | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद | : | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | सहायक आयुक्त पशुसंवर्धन, प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद | प्रतिनिधी- डॉ. म. मोईनोद्दीन, जिल्हा पशूसंवर्धन आयुक्त, औरंगाबाद -उपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष | : | १) डॉ. नामरे २) डॉ. इनामदार | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील सन २००० - ०१ ते २००८ - ०९ या कालावधीशी संबंधित त्रयस्थ पक्ष श्री. नामरे व इनामदार यांच्या संदर्भात काही माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०६-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ ते ५ व ७ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्याचे, ती वैयक्तिक स्वरुपाची तिऱ्हाईताची असल्यामुळे नाकारली व उर्वरित माहितीसाठी त्यांना एकूण १४/- रु. इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने दिनांक २५-०६-२००९ रोजी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ८ शी संबंधित माहिती त्यांना दिनांक २६-०६-२००९ रोजी टपालाद्वारे पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २३-०७-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०८-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ५ व ७ शी संबंधित माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (१) (ड) अन्वये देण्याचे नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०७-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष डॉ. इनामदार, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागितली आहे त्यांनी कट व कारस्थान करुन त्यांचे सेवा निवृती वेतन थकविल्यामुळे आणि त्यांना देय असलेले सेवानिवृत्ती वेतन प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना न्यायालयाकडे धाव घ्यावी लागली असल्याच्या कारणास्तव त्यांनी त्रयस्थ पक्षासंदर्भात ही माहिती मागितली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ५ व ७ शी संबंधित माहिती आजही हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मुद्दा क्रमांक १ ते ५ व ७ शी संबंधित माहिती, त्रयस्थ पक्षाशी वैयक्तिकरित्या संबंधित असल्यामुळे ती अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले, असे आयोगास स्पष्ट केले .

त्रयस्थ पक्ष श्री. इनामदार यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या विषयी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उघड करण्यात येऊ नये. कारण ती माहिती उघड झाल्याने त्यांच्या जीविताला धोका होऊ शकतो.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या दिनांक ०४-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ५ व ७ शी संबंधित माहिती प्राप्त होण्यासाठी द्वितीय अपील केल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, या मुद्यांद्वारे अपिलार्थीने डॉ. नामरे यांच्या तक्रारीची चौकशी केल्यानंतर डॉ. इनामदार यांना देण्यात आलेल्या समज पत्राची प्रत, डॉ. इनामदार सहा. आयुक्त यांचे विरुध्द ते जिल्हा परिषद, औरंगाबाद येथे कार्यरत असताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय चौकशीसंबंधी जोडपत्रे १ ते ४ दोषारोप व त्यावर झालेल्या चौकशीच्या संपूर्ण कागदपत्राच्या प्रती, त्रयस्थ पक्ष श्री. इनामदार हे पंचायत समिती, वैजापूर येथे कार्यरत असताना प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त औरंगाबाद यांनी केलेल्या चौकशी संदर्भात संपूर्ण कागदपत्रे, डॉ. इनामदार सहायक आयुक्त यांचेकडील प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त पदाचा कार्यभार काढून घेणेबाबत प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्तांनी दिलेल्या अर्धशासकीय पत्राची प्रत व त्यावर खात्याने केलेली कार्यवाही, जळगाव येथे डॉ. इनामदार यांना पाठविण्यासाठी प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद यांनी काढलेल्या आदेशाची प्रत व त्यावर डॉ. इनामदार हे रजेवर गेल्यानंतर त्यांनी सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रत, त्रयस्थ पक्ष डॉ. इनामदार हे पेडगाव, जिल्हा परभणी येथे कार्यरत असताना ते मुख्यालयात राहत नसल्याबाबत तेथील सरपंचाने दिलेल्या तक्रारीची प्रत आणि त्यावर केलेल्या चौकशी कागदपत्राच्या प्रती, अशी माहिती मागविली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षासंदर्भात ज्या मुद्यावर माहिती मागितली आहे ते प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त यांनी त्रयस्थ पक्षाचा कारभार काढून घेण्याबाबत लिहिलेल्या अर्धशासकीय पत्राची प्रत आणि त्यावर त्यांनी केलेली कार्यवाही व जळगाव येथे डॉ. इनामदार हे रुजू झाले असताना सह आयुक्त, औरंगाबाद यांनी त्रयस्थ पक्षाच्या जळगाव येथे पाठविण्यासंदर्भात काढलेल्या आदेशाची प्रत व त्रयस्थ पक्ष वैद्यकीय रजेवर गेल्यानंतर सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रत, ही माहिती वगळता अपिलार्थीस इतर मुद्यांवरील कोणतीही माहिती देय होत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ द्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना उघड करावी लागेल. कारण उर्वरित मुद्यांद्वारे अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात पूर्णतः वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागविली आहे. ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होऊ शकेल असे आयोगास वाटत नाही. ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (ङ) आणि ८ (ञ) चा भंग होऊन त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत अगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याच्या कारणाने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ शी

संबंधित माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगापुढे असे सादर केले की, त्यांना मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित माहिती मिळाली नाही. इतर मुद्दयांबाबत त्यांची आता तक्रार नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १९-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर भावराव चौंधे, रा. मधुबन निवास, प्लॉट नं. १०, सर्वे न. १८०/४ साफल्य नगर, ऑडीटर सोसायटीच्या मागे, जळगाव टी पॉइंट, हर्सुल, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५८३

सुनावणी दिनांक १९-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुर्यवंशी श्रीनंद संग्रामराव,<br>मु. आंबेगाव, पोस्ट गुरनाळ, तालुका देवणी,<br>जिल्हा लातूर | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>कार्यालय, देवणी, जिल्हा लातूर | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>लातूर | : | उपस्थित<br>(प्रतिनिधी-श्री. किशोर बाबूराव कवळीकर, वरिष्ठ सहायक) |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेअंतर्गत केल्या गेलेल्या गदगेश्वर ते भोपणी शिवपर्यंत झालेल्या कच्च्या रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रक व कामाच्या अंदाजपत्रकाच्या, मोजमापपुस्तिकेच्या आणि मजुराच्या हजेरीपटाची प्रत, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन २००५ ते २००८ असा आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. तसेच अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज गट विकास अधिकारी,पंचायत समिती,देवणी यांना उद्देशून केला होता. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १९-०५-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना शासकीय कालावधीमध्ये न पुरविल्याचे कारण दर्शवून, प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०८-२००९ रोजीच्या पत्राद्वारे निर्णय देऊन अपिलाच्या सुनावणीच्या पूर्वीच अपिलार्थीस माहिती दिली असल्याचा निष्कर्ष काढून

अपिलार्थीचे अपील निकाली काढले. यानंतर अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही चुकीची वाटल्यामुळे वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०७-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्यावेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती खोटी आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ज्या रस्त्याच्या कामाच्या मजुरांचे हजेरीपत्रकाची प्रत पुरविली आहे ते काम मूळात मजूर कामगाराकडून झाले नसून ते मशिनच्या सहाय्याने करण्यात आले आहे व तसेच या कामावर भोपणी गावाचे मजूर कधीही हजर नव्हते. त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती खोटी असल्याचे वाटत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात माहिती मागविली असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा अर्ज उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग उदगीर यांच्याकडे पाठविला. उप अभियंत्याकडून त्यांना दिनांक २३-०६-२००९ रोजी असे कळविण्यात आले की, हे काम त्यांच्या कार्यालयामार्फत रोजगार हमी योजनेतून केले गेलेले नाही. हे काम संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत केले गेलेले आहे. उप अभियंता यांनी दिलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना दिनांक २३-०६-२००९ रोजी प्राप्त झाली. उप अभियंत्याचे सदरचे पत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०६-२००९ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांना ज्या योजनेशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित होती त्या योजनेचे शीर्षक चुकीचे कळविले असल्यामुळे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद उप विभाग, उदगीर यांच्याशी संबंधित असल्याचे गट विकास अधिकाऱ्यांना वाटले. गट विकास अधिकाऱ्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधित उप अभियंत्याकडे पाठवून दिल्यानंतर उप अभियंत्याकडून गट विकास अधिकाऱ्यास दिनांक २३-०६-२००९ रोजी सदरचे काम पंचायत समितीशी संबंधित असल्याचे कळविले गेले. यानंतर त्यांनी दिनांक २४-०६-२००९ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहिती अपिलार्थीस खोटी वाटत आहे. कारण अपिलार्थीच्या मते काम मजुरामार्फत केले गेले नसून ते पंचायत समितीने मशिनरी लावून केले आहे व तसेच या कामासाठी

पंचायत समितीने लावलेले मजूर भोपणी या गावाचे नाहीत. या संदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. त्या प्रमाणे या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली गदगेश्वर ते भोपणी शिव या रस्त्याची माहिती विनामूल्य पुरविली आहे. प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे काही आक्षेप असतील तर या आक्षेपाचे निराकरण करुन घेण्याकरिता त्यांना महसूल आयुक्त हे स्वतंत्र व सक्षम प्राधिकरण उपलब्ध आहे. त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी यांच्याकडून या रस्त्याच्या कामासंदर्भात प्राप्त झालेल्या माहितीवरील त्यांच्या तक्रारीचे निवारण त्यांनी वेगळ्या अर्जाद्वारे महसूल आयुक्त औरंगाबाद अथवा इतर सक्षम यंत्रणा यांच्याकडून करुन घ्यावे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली असल्यामुळे व माहिती अधिकाऱ्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यात आली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी कोणतीही नवीन बाब आयोगासमोर आली नसल्याने, मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक : १९-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यवंशी श्रीनंद संग्रामराव, मु. आंबेगाव, पोस्ट गुरनाळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५८४

सुनावणी दिनांक १९-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. धनाजी महादेव वारे,<br>रा. खेड, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | श्री. के. डी. सांगळे, सहायक प्रकल्प अधिकारी- उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक ०७-०७-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १९-११-२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ०६.०७.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०७.२०१० रोजी आवश्यक ती माहिती दिली असून, त्यांनी मागणी केलेल्या माहितीमधील संदर्भित अर्जावर योग्य कार्यवाही झाल्याबद्दल त्यांचे शंकासमाधान झाले असल्यामुळे त्यांची यासंदर्भात कोणतीही तक्रार राहिलेली नाही. या पत्रामध्ये अपिलार्थीने आयोगास त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली

असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही नवीन युक्तिवाद करण्यात आला नसल्याने आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १९-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. धनाजी महादेव वारे, रा. खेड, तालुका जिल्हा उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५८५

सुनावणी दिनांक १९-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. चामले विपिनचंद्र बापूराव,<br>सुभाष चौक, लातूर | : अपिलार्थी : | उपस्थित |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>लातूर | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>लातूर | : | उपस्थित (प्रतिनिधी- श्री.किशोर बाबूराव कवळीकर, वरिष्ठ सहायक) |
| | त्रयस्थ पक्ष : श्री. तुळशीराम शिंदे प्राथमिक विद्यालय, लातूर | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष, श्री. तुळशीराम शिंदे प्राथमिक विद्यालय, लातूर या शाळेच्यासंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या शाळेस कोणत्या आधारे मान्यता दिली, मान्यता कोणत्या वर्षी दिली, सध्या अनुदान आहे काय, असेल तर तपशीलवार माहिती, शाळेची जागा मालकीची आहे की भाडयाची व भाडयाची असल्यास भाडेपट्टी मंजूर आहे का, व किती, शासनाच्या निकषाप्रमाणे शाळा आहे काय? किती वर्ग आहेत व किती वर्गांना मान्यता आहे, मूळ संस्था रामचंद्र ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था अंबुलग्याची ही शाखा आहे काय? असल्यास संस्थेची शाखेला मिळालेल्या परवानगी पत्राची प्रत, ज्या गृहनिर्माण संस्थेत शाळा चालते त्या संस्थेची परवानगी आहे काय, असल्यास परवानगी पत्राची प्रत- या मुद्यांचा समावेश होता. यानंतर अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसांच्या आत मिळाली नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.

२५.०८.२००९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०७.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

मागील सुनावणीच्यावेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. त्रयस्थ पक्ष त्यांच्या शाळेची शाखा ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये चालवित आहेत, ती शाळा चालविण्याची परवानगी त्रयस्थ पक्षास प्राप्त झाली नसल्याने ते अनधिकृतरित्या ही शाळा चालवित आहेत. त्यामुळे व्यापक जनहितासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आता उपलब्ध झाली असून ते ही माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा या शाळेच्या व्यवस्थापनाशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. केवळ त्यांच्या संस्थेला त्रास देण्याच्या उद्देशाने अपिलार्थी अशाप्रकारची माहिती सर्व शासकीय कार्यालयातून मागवित असतात. त्यांच्या संस्थेतर्फे होणारा सर्व व्यवहार पारदर्शक असतो.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०७.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीपैकी बराचशा भागाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे खुलासे व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयाबद्दल अथवा एखाद्या कृतीबद्दल अर्जदारास त्यांचे स्पष्टीकरण देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भित संस्थेस शासन मान्यता मिळाल्याचे पत्र, शासनाने ही मान्यता कोणत्या निकषांच्या आधारे दिली, या निकषासंबंधीची, संस्थेने शाळेच्या मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावासोबत सादर केलेली कागदपत्रे, शाळेस अनुदान मान्यता मिळाल्याचे आदेश, शाळेमधील संस्थेच्या वर्गांची संख्या आणि ज्या वर्गसंख्येला शाळेस मान्यता मिळाली आहे ती वर्ग संख्या, शाळेच्या शाखेला मिळालेल्या परवानगी पत्राची प्रत, एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली ही

माहिती तयार आहे. तथापि त्यामध्ये या शाळेला शासनाने ज्या कागदपत्रांच्या आधारे मान्यता दिली त्या कागदपत्रांचा समावेश नाही. या कागदपत्रांसोबत अपिलार्थीस देय असलेली माहिती आठ दिवसांच्या आत त्यांना उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कबूल केले आहे.

या प्रकरणी त्रयस्थ पक्षाने त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या वर्तनावर आक्षेप घेऊन त्यांच्या शाळेसंदर्भात अपिलार्थीस माहिती उघड करण्यासाठी आयोगाकडे नाराजी व्यक्त केली. तथापि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये सार्वजनिक स्वरुपाची माहिती उघड करताना अपिलार्थीच्या कथित वर्तनाची दखल घेण्याची कोणतीही तरतुद नसल्यामुळे, जरी ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाचा आक्षेप असला तरी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे सार्वजनिक स्वरुप पाहता, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस देय होणारी माहिती ही जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उघड करावी लागेल, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून आठ दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी कोणतीही नवीन बाब आयोगासमोर आली नसल्याने, मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय असलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक १९-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चामले विपिनचंद्र बापूराव, सुभाष चौक, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५८७

सुनावणी दिनांक १९-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे,<br>माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड | : प्रतिवादी : | उपस्थित<br>(प्रतिनिधी-श्री. टी.वाय.जाधव, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी) |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | उपस्थित |
| १ | त्रयस्थ पक्ष : मे. पंचशील इ. प्रा. बीड, श्री. के. एम. देशमुख, श्री. व्ही. एस. डुबे, श्री. एम. बी. राठोड | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व घाऊक, अर्धघाऊक, किरकोळ विक्रेत्यांच्या परवान्यासंदर्भात काही माहिती एकूण ७ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - घाऊक व अर्धघाऊक केरोसीन विक्रेते मे. पंचशील इ. प्रा. बीड आणि इतर, किरकोळ विक्रेते आर.पी.मेहेर आणि इतर यांच्या मूळ केरोसीन परवान्याची प्रत आणि बीड शहरातील गॅसधारकांची यादी सीडीमध्ये, बीड तालुक्याचे केरोसीन नियतन आणि विक्रेतेनिहाय गॅसधारक, कार्ड संख्या आणि शिधापत्रिकावरील लोकसंख्या - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०५-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-१०-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

विचाराधीन प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०७-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते आणि जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्षापैकी मे. पंचशील इं. प्रा. बीड यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.प्रकरणात आज दिनांक १९-११-२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांना सर्व संबंधिताकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती विहित मुदतीत देणे शक्य झाले नाही. तथापि आता त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती बरोबर आणली असून ती माहिती ते अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती जरी अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असली तरी या माहितीची व्याप्ती मोठी आहे. आज रोजी आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडील अपिलार्थीस देण्यासाठी उपलब्ध माहितीचे अवलोकन केले असता, ती माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असे सादर केले की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य व नोंदणीकृत डाकेने दिनांक ०७-०७-२०१० रोजीच्या पत्राद्वारे पाठविली असून ती अपिलार्थीस दिनांक १६-०७-२०१० रोजी प्राप्त झाली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १९-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६२३

सुनावणी दिनांक १९-११-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अनमोड विष्णुदास नागनाथराव, यश अपार्टमेंट, उल्हासनगर, मालेगांव रोड, (तरोडा खु.), तालुका जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर विभाग, लातूर | : | प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे | | : | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर विभाग, लातूर | : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर विभाग, लातूर | | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, विभागीय मंडळ लातूर आसन क्रमांक एल ओ ३८८३८ च्या गणित (बीजगणित / भूमिती) या विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकीत प्रती मागविल्या होत्या. ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीस

माहिती नाकारताना त्यांनी विभागीय मंडळ पत्र क्रमांक १०१४६, दिनांक ०८-१२-२००६ चा संदर्भ दिला. या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यानंतर दिनांक २९-०८-२००९ अन्वये प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-१०-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविता येत नसल्याचे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १३-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १९.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचे युक्तिवाद ऐकून घेण्यात आले.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या आसन क्रमांक एल ओ ३८८३८ च्या गणित (बीजगणित / भूमिती) या विषयाच्या उत्तरपत्रिकाच्या छायांकीत प्रतीची मागणी केल्याचे आढळून येत आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, राज्य माहिती आयोगाने वेळोवेळी माहितीच्या अधिकाराअंतर्गत अपिलार्थीस उत्तरपत्रिकांच्या प्रती देण्याचे वेगवेगळ्या निर्णयाव्दारे नाकारले आहे. मा. न्यायालयाने व केंद्रीय माहिती आयोगाने आतापर्यंत अशा प्रकारच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती अपिलार्थीस उघड करण्याचे नाकारले आहे. या प्रकरणी देखील हाच युक्तिवाद लागू होत असल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी आयोगास मान्य करता येणे शक्य नाही. सबब विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे युक्तिवाद ऐकून घेण्यात आले. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अमरावती, नागपूर राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठाकडील उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती देण्याच्या निर्णयावर मा. उच्च न्यायालयाने मनाई दिलेली आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाचा निर्णय लागल्यावर अपिलार्थी पुनश्चः नवीन अर्ज दाखल करु शकतील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक १९-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनमोड विष्णुदास नागनाथराव, यश अपार्टमेंट, उल्हासनगर, मालेगांव रोड, (तरोडा खु.), तालुका जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८४

सुनावणी दिनांक १९-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. वराट विश्वंभर सोनाजीराव,<br>मु. पो. भोकरंबा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : अपिलार्थी : | प्रतिनिधी- ॲड व्ही. यु. जाधव - उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, भगतसिंग विद्यालय, पळशी, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक ०७-०७-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांचे वकिलाने प्रकरणात म्हणणे मांडण्यासाठी पुढील तारीख मिळण्याची आयोगास विनंती केली. सदर विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणीची तारीख पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-११-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वराट विश्वंभर सोनाजीराव, मु. पो. भोकरंबा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, भगतसिंग विद्यालय, पळशी, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५९८

सुनावणी दिनांकः २३.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. चक्रधर दिगांबर गोविंदराव,<br>एन. डी. ४२, जे २१/४, हडको, नवीन नांदेड,<br>तालुका जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी :उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादीः |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी / अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद, नांदेड | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १.जन माहिती अधिकारी | : | कक्ष अधिकारी, सा. प्र. वि. जिल्हा परिषद, नांदेड | :उपस्थित |
| २.जन अपिलीय अधिकारी | : | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), सा. प्र. वि. जिल्हा परिषद, नांदेड | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, वरिष्ठ सहायक (लिपीक) या पदासाठी इतर मागासवर्गीय प्रवर्गातून एक पुरुष जागा का भरली नाही व अपिलार्थीस त्यांचा बैठक क्रमांक १३५३ व नोंदणी क्रमांक १७२० या पदासाठी १९ जुलै २००९ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये किती गुण मिळाले आणि त्यांच्या उत्तरपत्रिकेची सत्यप्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक २४.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. परंतु अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या आणि त्यावरील प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात दिनांक ०२.०९.२००९ रोजी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविली. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला होता की, नांदेड जिल्हा परिषदेकडून इतर मागासवर्गीय प्रवर्गातील एक पुरुष उमेदवाराची जागा का भरण्यात आली नाही, यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. जर नांदेड जिल्हा परिषदेने इतर मागासवर्गीय प्रवर्गातील जागा भरण्याचा निर्णय घेतला असता तर त्यांना लिपीक या पदावर नेमणूक देण्याची संधी प्राप्त झाली असती. तथापि जिल्हा परिषदेने इतर मागासवर्गीयांची भरती न केल्याने त्यांची ही संधी डावलली गेली आहे. त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता

की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०२-०९-२००९ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना टपालाव्दारे उपलब्ध करुन दिली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची सत्यप्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी टपालाव्दारे दिनांक ०२-०९-२००९ रोजी माहिती पाठविल्याचे सिध्द होत आहे.

मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०८.०७.२०१० रोजी व्यक्तिशः माहिती दिल्याचे आज सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थीनेही त्यांना माहिती मिळाल्याचे मान्य केले.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. चक्रधर दिगांबर गोविंदराव, एन. डी. ४२, जे २१/४, हडको, नवीन नांदेड, तालुका जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सा. प्र. वि. जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), सा. प्र. वि. जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५९९

सुनावणी दिनांक २३.११.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. शर्मा राजेंद्र हरीनारायण,<br>संपादक, नांदेड पोलखोल हरी कि गंगा, कोनार्क विहार, फरांदेनगर, (काबरानगरच्या पुढे), नांदेड | : | अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जिल्हा सांगली | : | प्रतिवादी | |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जिल्हा सांगली | | | :उपस्थित<br>(प्रतिनिधी -श्री. के.के.व्हटकर, कनिष्ठ लिपीक) |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १.जन माहिती अधिकारी | : | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जिल्हा सांगली | :उपस्थित<br>(प्रतिनिधी - श्री. के. के. व्हटकर,क.लि.) |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयास आर्थिक वर्ष २००८-०९ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास वेगवेगळया शीर्षाखाली प्राप्त झालेला निधी, या निधीमधून

जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या कामाची यादी, कामावर झालेला खर्च, अशी माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२.०७.२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस तीन पृष्ठांची माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०७.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१.०९.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि या निर्णयानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी प्रथमतः दिनांक २२.०७.२००९ रोजी अपिलार्थीस त्यांच्याकडील लेखाशीर्षनिहाय माहिती पुरविली आहे. तथापि कामनिहाय खर्चाची माहिती देण्याकरिता त्यांना त्यांच्या कार्यालयीन २५००० प्रकरणाशी संबंधित उप अभियंता तथा सर्व उप कार्यकारी अभियंता यांच्यावर अवलंबून राहावे लागते. त्यांच्या कार्यक्षेत्रातील या प्रकरणी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सांगली, कौठे महांकाळ व मिरज यांनी त्यांना वेळेवर माहिती न दिल्यामुळे ते अपिलार्थीस कामनिहाय माहिती पुरवू शकले नाहीत. अंतिमतः त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक २४.०६.२०१० रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठी नसून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीत देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना मोठी अडचण होती किंवा ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागत असल्याची शक्यता निर्माण होईल असे संभवत नाही. अपिलार्थीस ही संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २४.०७.२००९ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणे आवश्यक होते. ती माहिती या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४.०६.२०१० रोजी म्हणजे अंदाजे ११ महिन्याच्या विलंबाने पुरविली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१.०९.२००९ रोजी अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही संबंधित उप अभियंत्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सांगली, मिरज व कवठे महाकाळ हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. या प्रकरणात त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केलेल्या विहित मुदतीचे पालन न केल्यामुळे ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या

कारवाईस पात्र ठरत असल्याचे सिध्द होत आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, मिरज, सांगली, कवठे महांकाळ यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.०७.२००९ रोजी व दिनांक २४.०६.२०१० रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. तसेच अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्यानंतर प्राप्त झाली असल्याने आणि या प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही अभिप्राय लेखी स्वरुपात प्राप्त झाले नसल्यामुळे आणि यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

आज रोजीच्या सुनावणीच्यावेळी कोणतीही नवीन बाब आयोगासमोर मांडण्यात आली नाही.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, मिरज, सांगली व कवठे महांकाळ यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**

**दिनांक : २३.११.२०१० राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शर्मा राजेंद्र हरीनारायण, संपादक, नांदेड पोलखोल हरी कि गंगा, कोनार्क विहार, फरांदेनगर, (काबरानगरच्या पुढे), नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जिल्हा सांगली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जिल्हा सांगली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६००

सुनावणी दिनांक २३.११.२०१०

१ श्रीमती कडुबाई सुखदेव कळम, : अपिलार्थी :उपस्थित
रा. भवन, पो. सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी :अनुपस्थित
तहसीलदार, सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा :अनुपस्थित
उप विभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय,
सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्रीमती संगीता कु. दादाराव : अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.०३.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्रीमती कडुबाई सुखदेव कळम विरुध्द गैरअर्जदार श्रीमती संगीता कु. दादाराव कळम या प्रकरणामध्ये फेर क्रमांक ७८२ शी संबंधित प्रकरणात सुनावणीच्या एकूण किती तारखा झाल्या, प्रकरण कोणत्या तारखेला निकालासाठी राखून ठेवण्यात आले, या प्रकरणामध्ये निर्णय झाला आहे काय, निर्णय झाला असल्यास उभय पक्षांना नोटीशीव्दारे

कळविण्यात आला आहे काय, असल्यास त्याची प्रमाणित प्रत, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४.१२.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६० इतके त्यांना त्यांच्याकडे भरण्याचे सूचित केले. हे पत्र अपिलार्थीस दिनांक १६.०१.२००९ रोजी प्राप्त झाले. हे पत्र प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.०२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६.०२.२००९ रोजी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात येऊन माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६.०३.२००९ रोजी व्यक्तिशः उपस्थित झाल्या व त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८.०७.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष अनुपस्थित. अपिलार्थी, जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला होता की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो सुनावणीच्या एकूण किती तारखा झाल्या, प्रकरण कोणत्या तारखेला निकालासाठी राखून ठेवण्यात आले आणि त्यांना निर्णय देताना

जन माहिती अधिकारी यांनी नोटीस दिली होती का या मुद्दयावर माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीनुसार विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करावी आणि त्यांना उर्वरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस दिनांक ०४.१२.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे केला नाही. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील झालेल्या सुनावणीनंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०२-२००९ रोजी त्यांना हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ती घेऊन जाण्यासंदर्भात सूचित केले त्याप्रमाणे अपिलार्थीने ही माहिती त्यांच्याकडून दिनांक ०६-०३-२००९ रोजी हस्तगत करुन घेतली.

मागील सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १४.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीने संदर्भित केलेल्या प्रकरण क्रमांक २००६/एमएजी/अपील/सी.आर. ११८/०६ च्या सुनावणीमध्ये एकूण किती तारखा झाल्या, कोणत्या तारखेला प्रकरण निकालासाठी राखून ठेवण्यात आले व निर्णय झाला असल्यास उभय पक्षांना कळविण्यात आले आहे काय, या तीन मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस अद्यापपावेतो या प्रकरणाशी संबंधीत दर महिन्याच्या शेवटी आणि संदर्भित प्रकरणात निर्णय घेताना दिलेल्या नोटीसच्या प्रती पुरविल्या नसल्याचे आयोगास

आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरविण्याचे आयोगास आश्वासित केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस वरील परिच्छेदात नमूद केलेली व त्यांना देय असलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यावतीने त्यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो सुनावणीच्या एकूण किती तारखा झाल्या, प्रकरण कोणत्या तारखेला निकालासाठी राखून ठेवण्यात आले आणि त्यांना निर्णय देताना जन माहिती अधिकारी यांनी नोटीस दिली होती का या मुद्यांशी संबंधित माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीनुसार विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करावी आणि त्यांना उर्वरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली. सबब उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

२. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्रीमती कडुबाई सुखदेव कळम, रा. भवन, पो. सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३२०

सुनावणी दिनांक २३.११.२०१०

१ श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन, : अपिलार्थी :उपस्थित
घर नं. १-१४-९६, देवडी बाजार,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वक्फ मंडळ,
पानचक्की, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा :अनुपस्थित
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वक्फ मंडळ,
पानचक्की, औरंगाबाद

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, महाराष्ट्र वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद :अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.११.२००९ रोजी द्वितीय अपील फेरसादर केले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, " आशूरखाना सालार जंग औरंगाबाद या मालमत्तेचे पुन्हा रजिस्ट्रेशन कोणत्या कायद्याच्या आधारे करण्यात आले, ज्या व्यक्तींना करण्यात आले त्यांचा या वक्फ जागेवर काय हक्क आहे " अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८.०७.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधित मालमत्तेच्या हक्कावर दिवाणी न्यायालयातून प्रश्न उपस्थित केला होता. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२.०७.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस तत्कालीन माहिती अधिकाऱ्याने कोणती माहिती पुरविली याची आयोगाने विचारणा केली असता सदर माहितीचे अभिलेखे त्यांना तत्कालीन वक्फ अधिकाऱ्याने हस्तांतरित केले नसल्यामुळे ही माहिती सध्या त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे त्यांनी आयोगास अवगत केले आणि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित पत्र त्यांनी आयोगास दाखविले. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, वक्फ कलम ४३ च्या तरतुदीनुसार त्यांनी "खुला प्लॉट कबाडीपुरा, औरंगाबाद, तालुका जिल्हा औरंगाबाद " या संस्थेची अधिनियमातील कलम ४३ नुसार नोंदणी करीत असताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विचारात घेतली होती. संबधित संस्थेच्या मूळ अर्जाची आणि त्या अर्जाची छाननी केलेल्या वक्फ बोर्डाची प्रत अपिलार्थीस पुरविली आहे. सबब जन माहिती

अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले होते की, त्यांनी या प्रकरणी संबंधित संस्थेच्या नोंदणीपत्राची वक्फ कलम ४३ ची प्रत, संबंधित संस्थेने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे संस्थेच्या नोंदणीसाठी दिलेला अर्ज त्यातील वक्फ अधिकाऱ्यांनी केलेला तपासणी अहवालाशी संबंधित अपिलार्थीस अपेक्षित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी उपस्थित आहेत तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर प्रकरणातील सद्यस्थितीची माहिती सादर करण्यासाठी कोणीही उपस्थित नसल्यामुळे मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने दिलेल्या सूचना कायम ठेवण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन, घर नं. १-१४-९६, देवडी बाजार, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, महाराष्ट्र वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वक्फ मंडळ,

पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६०२

सुनावणी दिनांक २३.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाबासाहेब भिवसने,<br>रा. नगर परिषद कॉलनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>चौक परिसर, गंगापूर, जि. औरंगाबाद | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगापूर, जि. औरंगाबाद | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगापूर, जि.औरंगाबाद | | :उपस्थित<br>(प्रतिनिधी- श्री.भास्कर म्हस्के,शाखा अभियंता) |

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, गंगापूर, जि. औरंगाबाद :उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जानेवारी २००८ ते २९ जुन २००९ या कालावधीशी संबंधित नगर परिषद हद्दीतील चालू असलेल्या पुलाच्या कामाच्या, रस्त्याच्या कामाच्या, पथदिव्याचे कामाचे

अंदाजपत्रक व दिलेल्या निविदेच्या प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते व यासोबत नगर परिषदेने त्यांना दिनांक ०४.०९.२००८ रोजी दिलेले दारिद्र्यरेषेखालचे प्रमाणपत्र जोडले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १२,५००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे सदरचे पत्र त्यांच्या कार्यालयाच्या शिपायामार्फत पाठविले असता, सदर शिपायास अपिलार्थी दिनांक १५.०७.२००९ रोजी त्यांच्या निवासस्थानी भेटले नाहीत. शिपायाने दिनांक २२.०७.२००९ रोजी हेच पत्र अपिलार्थीस देऊ केले असता, या पत्राचा अपिलार्थीने स्वीकार केला नाही आणि अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ३१.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी दिनांक १०.०९.२००९ रोजी घेऊन या संदर्भातील त्यांचा निर्णय दिनांक ०५.१०.२००९ रोजी पारित केला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकाऱ्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०९.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्यावेळी अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असूनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे नाकारल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकाऱ्याने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस जरी त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र दिले असले तरीही हे प्रमाणपत्र स्वर्ण जयंती कार्यक्रमापुरतेच मर्यादित होते. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार हे प्रमाणपत्र दुसऱ्या शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरिता वैध धरले जात नाही. त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची दिनांक १५.०७.२००९ रोजी लेखी पत्राद्वारे विनंती केली असताना देखील, अपिलार्थीने हे शुल्क त्यांच्याकडे भरण्यास इन्कार केला. आजतागायत अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून, ही माहिती ते अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी तयार आहेत.

मागील सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये नमूद केल्याप्रमाणे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा सादर केला आहे. अपिलार्थीने, नगर परिषद, गंगापूर यांनी त्यांना दिनांक ०४.०९.२००८ रोजी ०८१ क्रमांकाद्वारे दिलेल्या दारिद्र्यरेषेच्या प्रमाणपत्राची प्रत त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेली होती. सदरचे प्रमाणपत्र नगर परिषदेने निर्गमित केल्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. जिल्हाधिकाऱ्याच्या ज्या आदेशानुसार त्यांनी अपिलार्थीस दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीसाठी उपलब्ध असलेल्या योजनेचा लाभ देण्याचे नाकारले जिल्हाधिकाऱ्याच्या त्या पत्राची प्रत आयोगाने मागितली असता, जन माहिती अधिकाऱ्यास जिल्हाधिकाऱ्याच्या पत्राची प्रत आयोगास उपलब्ध

करुन देता आली नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे ज्या, दिनांक १५.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले आहे, त्या पत्राचे अवलोकन केले असता, या पत्रामध्ये जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील दिलेला नाही, जो अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस देणे त्यांना आवश्यक होते. अशाप्रकारे जन माहिती अधिकाऱ्याने अधिनियमातील कलम ७ (५) व कलम ७ (३) (क) चा भंग केला असल्यामुळे, त्यांना आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत कार्यालयीन कामकाजाचा दिवस निश्चित करुन विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून आठ दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी कोणतीही नवीन बाब आयोगासमोर आली नाही. त्यामुळे मागील सुनावणीच्या वेळी काढलेले निष्कर्ष विचारात घेऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत कार्यालयीन कामकाजाचा दिवस निश्चित करुन विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३.११.२०१०**

**( दी. बा.देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. बाबासाहेब भिवसने, रा. नगर परिषद कॉलनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसर, गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६०३

सुनावणी दिनांक २३.११.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अनंत मधुकरराव मोव्हाडीकर (चोंधे),<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी : | :उपस्थित<br>(प्रतिनिधी - श्री. मधुकर भावराव चोंधे) |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,औरंगाबाद | : | प्रतिवादी : | :उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,औरंगाबाद<br>विभाग,औरंगाबाद | | | :उपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष : १) श्री. मधुकर भावराव चोंधे | | | : उपस्थित |
| | २) श्री. बंकले | | | : अनुपस्थित |
| | ३) श्री. वाघ | | | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.११.२००९ रोजी द्वितीय अपील फेरसादर केले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष,श्री. एम.बी. चोंधे यांच्यावर केल्या गेलेल्या विभागीय चौकशीच्यासंदर्भात आणि त्यांच्याकडून वसूलीपात्र असलेली रक्कम रु. ३,४६,०००/- च्या

तपशीलाकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण चार मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सहायक आयुक्त,पशुसंवर्धन यांच्याशी संबंधित असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत दि. ११.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे सहायक आयुक्त,पशुसंवर्धन,औरंगाबाद यांच्याकडे पाठविली व अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस दि. ११.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती दिली. सदर माहिती अपिलार्थीस दि. ११.०७.२००९ रोजी प्राप्त झाली. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १७.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०८.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीमध्ये अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०९.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व सर्व त्रयस्थ पक्ष उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष, श्री. एम.बी.चोंधे यांनी अपिलार्थीचे ते वडील असून त्यांच्या संदर्भातील माहिती मागितल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, श्री. इनामदार यांनी महालेखापाल,नागपूर यांना, श्री. चोंधे यांच्यावर रु.३,४६,०००/- ची वसूली बाकी असल्याचे कळविले असल्याने अद्यापपावेतो त्यांचे सेवानिवृत्तीप्रकरण मंजूर झाले नाही.यासाठी त्यांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे धाव घ्यावी लागली आहे. संबंधित पशुसंवर्धन उपआयुक्त

यांनी श्री. चोंधे व इतर अधिकारी यांच्यावर एकत्रितरित्या रु.३,४६,०००/- वसूली असल्याचे नमूद केले होते. यापैकी श्री. चोंधे यांच्यावर निश्चितपणे किती वसूली लावण्यात आली, हे समजण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे. त्यांच्यावर झालेल्या कथित अन्याय प्रकरणी त्यांनी न्यायालयात धाव घेण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.अन्य त्रयस्थ पक्ष, श्री. बंकले व श्री. वाघ हे जिल्हा पशुसंवर्धन खात्यातून वर्ग-४ संवर्गातील सेवानिवृत्त कर्मचारी असून त्यांना सेवानिवृत्तीची तारीख उलटून गेल्यानंतरही सेवेत ठेवल्याप्रकरणी श्री. चोंधे व इतर अधिकारी यांच्यावर चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांनी संदर्भित केलेल्या रु. ३,४६,०००/- या रकमेचा तपशील त्यांच्याकडे उपलब्ध नाही. सदरची रक्कम श्री. इनामदार नावाच्या त्यांच्या पूर्वीच्या अधिकाऱ्याने स्वतःच्या पातळीवर महालेखापाल,नागपूर यांना कळविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये संदर्भित केलेल्या विभागीय चौकशी प्रकरणात आयुक्त, पशुसंवर्धन यांनी शासनाकडे मार्गदर्शन मागितले आहे. तथापि शासनाकडून अद्यापपावेतो मार्गदर्शन प्राप्त होणे बाकी असल्याने तसेच नियुक्ती प्राधिकारी आयुक्त,पशुसंवर्धन, पुणे असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती आयुक्त,पशुसंवर्धन कार्यालय, पुणे यांच्या कार्यलयाकडून घ्यावी लागेल.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष,श्री. एम.बी.चोंधे यांच्यावरुन विभागीय चौकशी प्रकरणात दोषारोपपत्र,जोडपत्र क्र.१ ते ४ ची प्रत मागितली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन अद्यापपावेतो श्री. चोंधे यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार दोषारोपपत्र बजावले गेले नसल्यामुळे ही माहिती त्यांच्याकडे अस्तित्त्वात नाही. तथापि त्यांनी ही बाब अपिलार्थीस त्यांच्या दि.११.०६.२००९ रोजीच्या

अर्जासंदर्भात अपिलार्थीस कळविलेली नाही. ती त्यांना आता अपिलार्थीस कळवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,औरंगाबाद यांनी चोंधे व इतर अधिकाऱ्यांकडून सामुहिकरित्या रु. ३,४६,०००/- इतकी रक्कम वसूलीपात्र असल्याचे त्यांच्या दि. ०४.०३.२००९ रोजीच्या पत्रान्वये महालेखापाल,नागपूर-२ यांना कळविले आहे. या रकमेचा अधिकारीनिहाय व कर्मचारीनिहाय तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे आजमितीस उपलब्ध नाही. तथापि या प्रकरणी आयुक्त, पशुसंवर्धन,म.रा.पुणे यांनी त्यांच्या स्तरावर या संदर्भात अधिकारीनिहाय व कर्मचारीनिहाय वसूलीची रक्कम दर्शविणारा तक्ता असलेला एक प्रस्ताव तयार करुन शासनाच्या मार्गदर्शनासाठी दि.२२.११.२००९ रोजी सादर केलेला आहे. त्यामुळे या प्रस्तावाची प्रत अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ शी संबंधित माहितीच्या संदर्भातील माहिती प्राप्त करुन घेण्यास मदत होऊ शकेल, असे आयोगास वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी, वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित माहिती आयुक्त, पशुसंवर्धन,म.रा.पुणे यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**

**दिनांक : २३.११.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. अनंत मधुकरराव मोव्हाडीकर (चोंधे),रा.मधुबन निवास, प्लॉट नं.१०, स.न.१८०/४, साफल्य नगर, ऑडिटर सोसायटीच्या मागे,जळगाव टी पॉईंट,हर्सूल,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६०४

सुनावणी दिनांक २३.११.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. मनोज बाबूराव शिंदे,<br>रा.लातूर | : | अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता श्रेणी-१,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,लातूर | : | प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर | | | :अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी | : | १) सहायक अभियंता श्रेणी-१,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग<br>क्र.१,लातूर | :अनुपस्थित |
| | | २) उपविभागीय अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम<br>उपविभाग,रेणापूर,जि.लातूर | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील लातूर शहरातील शिवाजी चौक ते रेणापूर

फाटा  या रस्त्याच्या चार पदरीकरणाच्या अंदाजपत्रकाची प्रत, निविदेची प्रत,डीसीआर,बिलाच्या आणि दि. ०८.०७.२००९ पर्यंत दिलेल्या सर्व देयकांची छायाप्रती अशी माहिती देण्याची विनंती केली आहे.अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीचा दि. ०८.०७.२००९ रोजीचा मूळ अर्ज त्यांनी सहायक अभियंता श्रेणी -१, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१  यांच्याकडे केला होता. त्यांना अपिलार्थीचा हा अर्ज दि. १४.०७.२००९ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून दि. १०.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११५०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदरचे पत्र त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत पाठविले. तथापि सदरचे पत्र, संबंधित शिपायाने, अपिलार्थी त्यांच्या नमूद पत्त्यावर सापडत नसल्याच्या कारणास्तव, दि. ११.०८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत केले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ११.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०९.२००९ रोजी निर्णय देऊन सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित राहिल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०९.०७.२०१० रोजी घेण्यात आली.  सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला होता. आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगासमोर अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचा प्रतिनिधी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाही.

मागील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये आवश्यक तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११५०/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले असले तरी प्रत्यक्षात हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झालेले नाही. याही उपर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीनुसार या शुल्काचा तपशील त्यांनी अपिलार्थीस कळविणे आवश्यक होते, तो तपशील त्यांनी या पत्रामध्ये दिलेला नाही. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) व ७(३)(क) चा भंग केल्यामुळे त्यांना आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ७(६) मधील तरतुदीप्रमाणे विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून आठदिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर

अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी कोणतीही नवीन बाब आयोगासमोर आली नाही. त्यामुळे मागणी सुनावणीच्यावेळी काढण्यात आलेले निष्कर्ष विचारात घेऊन आयोगातर्फे खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मनोज बाबूराव शिंदे,रा.मोतीनगर,रिंग रोड,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, रेणापूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६०५

सुनावणी दिनांक २३.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अब्दुल माजीद महमद इब्राहीम,<br>बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत<br>कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी :उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| जन अपिलीय अधिकारी | : | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर यांच्याशी संबंधित एकूण ३ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जानेवारी ते एप्रिल

२००९ या कालावधीमध्ये झालेल्या मासिक बैठकीच्या प्रोसिडींगच्या सत्यप्रती, ग्रामसभा झालेल्या ठरावाच्या सत्यप्रती, शौकतअली यांचे किराणा दुकानापासून ते ॲडव्होकेट मगरे यांच्या घरापर्यंत एप्रिल २००९ मध्ये झालेल्या सिमेंट रस्त्याच्या कामाच्या योजनाचे नाव, अंदाजपत्रकाच्या प्रती व मोजमाप पुस्तिकाच्या प्रती, मोजमापे ज्यांनी केली त्यांचे नाव - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१.०८.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक १०.०९.२००९ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे प्रतिनिधी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी दिनांक ०८.०९.२००९ रोजी त्यांच्या निवासस्थानी गेले असता अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले आणि वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०९.०७.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील व आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याप्रमाणे त्यांनी दिनांक ०८.०९.२००९ रोजी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी

केलेली माहिती विनामूल्य व व्यक्तिशः देऊ केली असता ती घेण्याचे अपिलार्थीने नाकारले. या घटनेचा पंचनामा त्यांनी करुन ठेवला असून या पंचनाम्याची प्रत आयोगास सादर केली.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८.०९.२००९ रोजी विनामूल्य देऊ केली असता अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेण्याचे नाकारले आहे. या घटनेचा जन माहिती अधिकारी यांनी पंचनामा करुन अपिलार्थीने माहिती नाकारल्याच्या संदर्भात सबळ पुरावा सादर केला आहे. तेव्हा जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याची आणखी एक संधी देण्याच्यादृष्टीने एक विशिष्ट तारीख व वेळ निश्चित करुन जन अपिलीय अधिकारी यांच्या समक्ष माहिती हस्तांतरित करुन घेण्यासंदर्भात एक सूचनापत्र नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे. एवढे करुनही अपिलार्थी माहिती हस्तगत करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपस्थित न राहिल्यास त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य नाही, असे अनुमान काढून प्रकरण दप्तरीदाखल करण्यात यावे.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, विनामूल्य, व्यक्तिशः व जन अपिलीय

अधिकारी यांच्यासमक्ष हस्तांतरित करुन देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : २३.११.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. अब्दुल माजीद महमद इब्राहीम, बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६०६

सुनावणी दिनांक २३.११.२०१०

१ श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर, : अपिलार्थी :अनुपस्थित

व्दारा- श्री. मनोज बाबुराव शिंदे, मोतीनगर, रिंग रोड, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद, लातूर (सा. बा. विभाग)

२ जन अपिलीय अधिकारी,
नगर परिषद, लातूर

आज रोजी प्रत्यक्षात :

१.जन माहिती अधिकारी : नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर :अनुपस्थित
२.जन अपिलीय अधिकारी : मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर :अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०७.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांना परत दिनांक १३.०४.२००९ रोजी या माहितीसंदर्भात स्मरणपत्र दिले. तथापि माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या

अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६.०५.२००९ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश दिनांक ०६.०५.२००९ रोजी जारी केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. अपिलार्थीचे अपील नामंजूर करताना अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही सदर माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाही या जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावर आधारीत त्यांनी हा निर्णय दिला. अपिलार्थीचे अपील नामंजूर करताना जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकाऱ्यास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य व अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे देण्याचे देखील आदेशित केले होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९.०५.२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे माहिती पाठविली. तथापि अपिलार्थी दिलेल्या पत्त्यावर आढळून न आल्यामुळे अपिलार्थीस या माहितीची तामिली होऊ शकली नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०९.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थी श्री. रमेश क्षीरसागर ही व्यक्ती खरोखरच अस्तित्वात आहे किंवा कसे याबाबत त्यांना शंका आहे. कारण अपिलार्थी त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते स्वतः कधीही हजर राहत नाहीत. या प्रकरणी प्रथम अपील सुनावणीच्या वेळी ते स्वतः उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९.०५.२००९ रोजी पोस्टाव्दारे माहिती पाठविली असता सदर माहिती पोस्टाने त्यांना दिनांक ०२.०६.२००९ रोजी

विना तामिली परत प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस दिनांक २९.०५.२००९ रोजी त्यांनी माहिती पाठविल्याचा सबळ पुरावा आयोगास सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नव्हते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थी जरी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असले तरी त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होण्यासाठी स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहणे भाग आहे. सबब त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या कालावधीपर्यंत कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून संबंधितांकडून त्यांनी या प्रकरणी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या कोणत्याही प्रतिनिधीस देय असणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नगरपरिषदेने दिलेल्या कथित दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची स्वतः तपासणी करुन घ्यावी असेही जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या कालावधीपर्यंत कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयातून संबंधितांकडून त्यांनी या प्रकरणी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : २३.११.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर, व्दारा- श्री. मनोज बाबुराव शिंदे, मोतीनगर, रिंग रोड, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६०९

सुनावणी दिनांक २३.११.२०१०

१. श्री. मधुकर विश्वनाथ धडे, : अपिलार्थी : अनुपस्थित

रा. हामणे गल्ली, अहमदपूर, ता. अहमदपूर, जि. लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी :

मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, अहमदपूर, जि. लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा :अनुपस्थित

मुख्याधिकारी, नगर परिषद अहमदपूर, जि. लातूर

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : सहायक कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, अहमदपूर, जि. लातूर :अनुपस्थित

त्रयस्थ पक्ष : श्री. रानबा नारायण धडे :अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.११.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. रानबा नारायण धडे यांच्या सर्वे नंबर १९८/२ या नगर परिषदेच्या हद्दीतील जमिनीमध्ये किती प्लॉटच्या रजिस्टरवर नोंदी आहेत, त्या प्लॉटचे आकारमान,

त्यांची चतु:सीमा, त्यात एन. ए. झालेले किती प्लॉट आहेत त्याचा नकाशा व सर्वे नंबर २०३ मधील अशाच प्रकारची माहिती, अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २१.०८.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर विहित मुदतीत निर्णय न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १२.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते आणि अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी आयोगासमोर अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर, जि. लातूर यांनी दिनांक २६.११.२००८ रोजी निर्णय दिला असून, सुनावणीमध्ये ठरल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०६.०७.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले.त्या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाल्यामुळे ते सदरचे विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे नमूद केले आहे व तसेच या पत्रामध्ये त्यांनी त्यांना माहितीची आवश्यकता नसल्याचे नमूद केले आहे.

वरील घटनाक्रम व खुद्द अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे दिनांक ०६.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे माहिती प्राप्त झाल्याची दिलेली कबूली पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत

नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला असल्याचे अभिप्राय आयोगाने व्यक्त केले होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी कोणतीही नवीन बाब आयोगासमोर आली नाही. त्यामुळे मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मधुकर विश्वनाथ धडे, रा. हामणे गल्ली, अहमदपूर, ता. अहमदपूर, जि. लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, अहमदपूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद अहमदपूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६१६

सुनावणी दिनांक २३.११.२०१०

१ श्री. अकबर शमशोद्दीन शेख, : अपिलार्थी :अनुपस्थित

रा. जुनोनी, पो. ता. जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,

जिल्हा परिषद, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,

जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी : | सचिव, ग्रामपंचायत<br>जुनोनी,ता.जि.उस्मानाबाद | :उपस्थित<br>(प्रतिनिधी - श्री. शेख वजीर अध्यक्ष, ग्रा.प.स्वच्छता समिती,जुनोनी) |
| २. जन अपिलीय अधिकारी : | उपविभागीय अभियंता,<br>ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा<br>परिषद उपविभाग उस्मानाबाद | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये कार्यकारी

अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे, भारत निर्माण योजनेअंतर्गत जुनोनी, पो.ता.जि.उस्मानाबाद येथील पाणी पुरवठ्यासंदर्भात विहिरीच्या कामाशी संबंधित दिनांक ०३-०८-२००९ रोजीपर्यंत केलेल्या कामाच्या मोजमापपुस्तिकेच्या प्रती आणि किर्दीच्या छायांकित प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर काहीही कार्यवाही केली नाही. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०४-०९-२००९ रोजी परत कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर उप विभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी दिनांक २९-०९-२००९ रोजी निर्णय देऊन संबंधित पाणी पुरवठा समितीच्या सचिवांना अपिलार्थीस दिनांक ०८-१०-२००९ रोजी माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १३.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा समिती, जुनोनी उपस्थित होते आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्यावेळी अपिलार्थीने संबंधित ग्रामीण पाणी पुरवठा समितीवर अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करुन, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले होते आणि समितीचे अध्यक्ष नबी वजीर शेख हे आयोगासमोर उपस्थित होते, त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या पाणी पुरवठा समितीने नेमलेल्या खाजगी

अभियंत्याकडे उपलब्ध असल्याने त्यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना वेळ लागला. त्यांनी आता ही माहिती बरोबर आणली असून, अपिलार्थीस ते ही माहिती विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या बरोबर आणलेली माहिती आयोगास दाखविली. या माहितीचे अवलोकन करता ही माहिती सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले असल्याचे अभिप्राय आयोगाने व्यक्त केले होते. ही माहिती आयोगाच्या समक्ष अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जुनोनी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः व विनामूल्य हस्तांतरित केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीची विनंती की, संबंधित पाणी पुरवठा समितीच्या सचिवांवर शास्तीची कार्यवाही करण्यात यावी, ही आयोगास मान्य करता येणार नाही. कारण अपिलार्थीने कार्यकारी अभियंत्याकडे ज्या पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात माहिती मागविली आहे, त्या योजनेच्या अंमलबजावणीचे स्वरुप हे शासनाच्या नियमित विकास योजनेच्या अंमलबजावणीसारखे नाही. ही योजना ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतून राबवावयाची असून, ही योजना संबंधित ग्रामस्थांमधून निवड केलेल्या पाणी पुरवठा समितीमार्फत राबविली जाते. अपिलार्थीने संबंधित समितीकडे जी माहिती मागितली आहे ती माहिती कार्यकारी अभियंत्याकडे उपलब्ध नसून, ती माहिती खाजगी ग्रामस्थांद्वारे गठीत केल्या गेलेल्या समितीकडे उपलब्ध असते. ही समिती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण नाही. त्यामुळे अपिलार्थीची या समितीच्या सचिवांवर शास्ती लावण्याची विनंती आयोगास मान्य करता येत नाही. आज रोजी आयोगाच्या समक्ष संबंधित समितीच्या अध्यक्षांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य व व्यक्तिशः पुरविली आहे. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी समितीचे तत्कालीन अध्यक्ष श्री. नबी वजीर शेख उपस्थित आहेत. प्रकरणात कोणत्याही नवीन बाबी आयोगासमोर सादर करण्यात आल्या नाहीत. हे पाहता, दि. १३.०७.२०१० रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाने काढलेले निष्कर्ष कायम करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २३.११.२०१०**

**( दी. बा.देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. अकबर शमशोद्दीन शेख, रा. जुनोनी, पो. ता. जि. उस्मानाबाद

२ सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, जुनोनी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, ता.जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६०८

सुनावणी दिनांक २३-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अकबर शमशोद्दीन शेख,<br>रा. जुनोनी, पोस्ट तालुका जिल्हा उस्मानाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा<br>विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा<br>विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | सचिव, ग्रामिण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, वलगूड, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | | उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, उस्मानाबाद | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे, भारत निर्माण योजनेअंतर्गत वलगूड येथील पाणी पुरवठ्यासंदर्भात पाण्याची पाईपलाईन व पाणी टाकी यांच्या दिनांक ०३-०८-२००९ रोजीपर्यंत केलेल्या कामाच्या मोजमापपुस्तिकेच्या प्रती आणि किर्दीच्या छायांकित प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर काहीही कार्यवाही केली नाही. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०४-०९-२००९ रोजी परत कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अर्जावर उप विभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी दिनांक २९-०९-२००९ रोजी निर्णय देऊन संबंधित पाणी पुरवठा समितीच्या सचिवांना अपिलार्थीस दिनांक ०८-१०-२००९ रोजी माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १२-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दि. २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने संबंधित ग्रामीण पाणी पुरवठा समितीवर अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करुन, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

मागील सुनावणीच्या वेळी समितीचे सचिव श्री. सुग्रीव साहेबराव भोंग हे आयोगासमोर उपस्थित होते, त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या पाणी पुरवठा समितीने नेमलेल्या खाजगी अभियंत्याकडे उपलब्ध असल्याने त्यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना वेळ लागला. त्यांनी आता ही माहिती बरोबर आणली असून, अपिलार्थीस ते ही माहिती विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या बरोबर आणलेली माहिती आयोगास दाखविली. या माहितीचे अवलोकन करता ही माहिती सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले असल्याचे अभिप्राय आयोगाने व्यक्त केले होते. त्यावेळी ही माहिती आयोगाच्या समक्ष सचिव,ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, वलगुड यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः व विनामूल्य हस्तांतरित केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीची विनंती की, संबंधित पाणी पुरवठा समितीच्या सचिवांवर शास्तीची कार्यवाही करण्यात यावी, ही आयोगास मान्य करता येणार नाही. कारण अपिलार्थीने कार्यकारी अभियंत्याकडे ज्या पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात माहिती मागविली आहे, त्या योजनेच्या अंमलबजावणीचे स्वरुप हे शासनाच्या नियमित विकास योजनेच्या अंमलबजावणीसारखे नाही. ही योजना ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतून राबवावयाची असून, ही योजना संबंधित ग्रामस्थांमधून निवड केलेल्या पाणी पुरवठा समितीमार्फत राबविली जाते. अपिलार्थीने संबंधित समितीकडे जी माहिती मागितली आहे ती माहिती कार्यकारी अभियंत्याकडे उपलब्ध नसून, ती माहिती खाजगी ग्रामस्थांद्वारे गठीत केल्या गेलेल्या समितीकडे उपलब्ध असते. ही समिती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण नाही. त्यामुळे अपिलार्थीची या समितीच्या सचिवांवर शास्ती लावण्याची विनंती आयोगास मान्य करता येत नाही. आज रोजी आयोगाच्या समक्ष संबंधित

समितीच्या सचिवांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य व व्यक्तिशः पुरविली आहे. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे कोणतीही नवीन माहिती आयोगास सादर करण्यात आली नाही.

दिनांक १२-०७-२०१० रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाने काढलेले निष्कर्ष कायम करण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २३-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अकबर शमशोद्दीन शेख, रा. जुनोनी, पोस्ट तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामिण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, वलगूड, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६१०

सुनावणी दिनांक २३-११-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती जयश्री पि. दिनकरराव देशमुख,<br>रा. सौभाग्यवती निवास, मु. पो. झरी, तालुका<br>जिल्हा परभणी - ४३१ ५४० | : | अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग,<br>परभणी | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कक्ष अधिकारी, जिल्हा परिषद (शिक्षण<br>विभाग), परभणी | | : |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | उपस्थित (प्रतिनिधी- श्री. श्रीकांत कुलकर्णी, उप शिक्षणाधिकारी ) |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-११-२००९ (मूळ दि. १९-१०-२००९ रोजीचे) रोजी व्दितीय अपील फेरसादर केले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जिल्हा परिषद,परभणी अंतर्गत शिक्षण विभागातील जून, २००९ मधील सर्वसाधारण शिक्षकांच्या बदल्यांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या नावाची यादी मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शिक्षकांची नावे व शाळा, शिक्षकांचे पदनाम,

पदस्थापना दिलेली शाळा, मूळ शाळा ते पदस्थापना दिलेल्या शाळेपर्यंतचा कालावधी (बदली झालेली शाळा) - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १४.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,परभणी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १२.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २३-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही. या प्रकरणी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या वेळी माहितीसाठीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे केला होता, त्यावेळी श्री. चौधरी नावाचे कक्ष अधिकारी हे जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले होते. त्यांच्या कार्यालयातील उपलब्ध अभिलेख्यावर त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दि. ०८.०७.२००९ रोजी पाठविल्याचे त्यांना आढळून आले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चित कोणती माहिती पाठविली, याची आयोगाने त्यांच्याकडे विचारणा केली असता, संबंधित जन माहिती अधिकारी आयोगास आवश्यक ती कागदपत्रे दाखवू शकले नाहीत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आता सोबत आणलेली असून ते अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली, या त्यांच्या विधानापृष्ठयर्थ त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची छायाप्रत आयोगास सादर केली असून त्यांनी जावक नोंदवहीवरुन अपिलार्थीबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील "३२३३" या क्रमांकाच्या पत्राने पत्रव्यवहार केला असल्याचे फक्त सिध्द होत आहे. तथापि निश्चित कोणता पत्रव्यवहार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीसोबत केला, हे उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगास दाखवू शकत

नाहीत.  त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०८.०७.२००९ रोजी माहिती पुरविल्याचा मुद्दा आयोग मान्य करीत नाही. आज रोजी अपिलार्थीस देण्यात आलेल्या जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या बरोबर आणलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील,'मूळ शाळा ते पदस्थापना दिलेल्या शाळेपर्यंतचा कालावधी' म्हणजेच प्रत्येक शिक्षकांच्या त्यांच्या बदलीपूर्व ठिकाणाच्या कालावधीच्या माहितीचा समावेश नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत देण्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील प्रत्येक शिक्षकांच्या त्यांच्या बदलीपूर्व ठिकाणाच्या कालावधीची, शिक्षकनिहाय माहिती,अपिलार्थीस  हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. चौधरी, कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग,जिल्हा परिषद, परभणी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीनुसार करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेली उर्वरित माहिती - सर्वसाधारण बदल्यासंदर्भातील जून २००९ मध्ये समाविष्ट असलेल्या शिक्षकांची यादी  - आयोगास सादर केली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील प्रत्येक शिक्षकांच्या त्यांच्या बदलीपूर्व ठिकाणाच्या कालावधीची, शिक्षकनिहाय माहिती,अपिलार्थीस  हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. चौधरी, कक्ष अधिकारी शिक्षण विभाग,जिल्हा परिषद, परभणी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २३-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती जयश्री पि. दिनकरराव देशमुख, रा. सौभाग्यवती निवास, मु. पो. झरी, तालुका जिल्हा परभणी - ४३१ ५४०.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६११

सुनावणी दिनांक २३-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड,<br>रा. गायकवाड वाडी, शिवराई रोड वैजापूर,<br>तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद | | : उपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : उप अधीक्षक भूमि अभिलेख, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १२-०७-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"भूसंपादन प्रकरण/LAO/प्रकरणे/फेरफार/९४/१०२२/स.नं.१५२,वैजापूर भूसंपादन प्रकरणातील (१) भूसंपादन नकाशा नक्कल (२) परिशिष्ट १६ नक्कल मिळणेबाबत."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ११.०९.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.१०.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीनंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी दिनांक १२.०७.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी 'परिशिष्ट-१६' ची प्रत त्यांना या प्रकरणाशी संबंधित भूसंपादन अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. परंतु त्यांच्या मूळ अर्जातील भूसंपादन नकाशाची नक्कल त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त व्हावयाची आहे. ही नक्कल प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याशी वारंवार संपर्क साधूनही त्यांना ही माहिती जन माहिती अधिकाऱ्याकडून प्राप्त होऊ शकली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणाशी संबंधित भूसंपादन झालेल्या क्षेत्राच्या नकाशाची नक्कल त्यांच्या कार्यालयाकडून गहाळ झाली असून त्यांनी या प्रकरणी बराच शोध घेऊनही त्यांना अद्यापपावेतो त्यांच्या कार्यालयात ही नक्कल आढळून आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मुंबई-नागपूर महामार्गाकरिता त्यांच्या मालकीच्या जमिनीतील संपादित क्षेत्रासंदर्भात, यापूर्वीही माहिती अधिकाराखाली अनेक अपील अर्ज दाखल करुनही त्यांना त्यांच्या कार्यालयाकडून आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या कायम स्वरुपी जतन करुन ठेवावयाच्या अभिलेख्यातील माहिती आहे.तथापि एवढे असूनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो ही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती -त्यांच्या संपादित झालेल्या क्षेत्राचा नकाशा - संबंधित भूसंपादन अधिकारी आणि ही जमिन शासनाच्या ज्या महामंडळाने संपादित केली आहे, त्या प्राधिकरणाकडेही तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी पुरविलेली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या कार्यालयाशी संपर्क साधून त्यांच्याकडून ही माहिती घेऊन अपिलार्थीस आतापर्यंत पुरविता आली असती, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती आतापर्यंत केलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती द्यावी लागेल. आता अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसांचा कालावधी देण्यात येत असून त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, याप्रकरणी अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जर या कालावधीमध्ये ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात आढळून आली नाही तर, त्यांनी ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करुन या प्रकरणी त्यांनी नोंदविलेल्या एफ.आय.आर.ची प्रत त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती, त्यांच्या कार्यालयातील, अभिलेख्यांच्या वर्गीकरणाप्रमाणे 'अ' संवर्गातील (कायम स्वरुपी जतन करुन ठेवावयाची ) असूनही अपिलार्थीस अपेक्षित माहिती उपलब्ध करुन दिली गेली नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहे. सबब, सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, वैजापूर व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या सर्व संबंधित सहकारी कर्मचारी/अधिकारी (जे अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार "माहिती अधिकारी" समजले जातात.) या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले होते.

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या नकाशाच्या प्रतीसह संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी अन्यथा संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करुन एफ.आय.आर.ची प्रत अपिलार्थीस पुरवावी.

३. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, वैजापूर व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या सर्व संबंधित सहकारी कर्मचारी/अधिकारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सादर केले की, नकाशाबद्दलची नस्ती ही दुस-या फाईलच्या नस्तीमध्ये नजरचुकीने गेली होती. त्याचा कसोशीने शोध घेतल्यानंतर ती नस्ती सापडली. ही नस्ती रस्ते विकास महामंडळाकडे उपलब्ध होती. त्यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कागदपत्राच्या व नकाशाच्या प्रती काढून या प्रती अपिलार्थीस दिनांक ११-०८-२०१० रोजी व्यक्तिशःविनामूल्य पुरविण्यात आलेल्या आहेत. नकाशाच्या ४ नकाला मिळाल्याबाबत पोच जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ११-०८-२०१०

रोजीच्या पत्रावर दिली आहे. अपिलार्थी आज रोजी उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी विशेष प्रयत्न करुन माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे मागील सुनावणीच्यावेळी उपरोक्तप्रमाणे काढण्यात आलेले निष्कर्ष (अनु क्र.२ व ३) कायम करण्याची आवश्यकता नसल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**

**दिनांक २३-११-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड, रा. गायकवाड वाडी, शिवराई रोड वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक भूमि अभिलेख, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६१२

सुनावणी दिनांक २३-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जनार्दन दत्तात्रय साळी,<br>एस. टी. कॉलनी, नाईक वाडा, स्वयंवर मंगल कार्यालयाजवळ, जालना | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>व्दारा तालुका कृषि अधिकारी, अंबड | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये सन २००३-०४ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयामार्फत संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत केल्या गेलेल्या बंडींग कामाचा प्रकार (नाली, माती, सिमेंट), झालेला खर्च, मजूर उपस्थितीच्या सत्यप्रती, धान्य कुपन व मजूर ओळखपत्राचा क्रमांक, अशी माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १४,३९२ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०९-२००९ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १२-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिका-याने त्यांना या प्रकरणी आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्यासाठी दिलेले पत्र त्यांना उशिरा प्राप्त झाले. सदरचे पत्र जन माहिती अधिका-याने दिनांक २०-०८-२००९ ही तारीख टाकून प्रत्यक्षात पोस्टामध्ये दिनांक ११-०९-२००९ रोजी टाकले असता हे पत्र त्यांना १६-०९-२००९ रोजी प्राप्त झाले असून त्यांना ही माहिती विनामूल्य मिळावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी मुदतीत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील विहित केलेल्या तरतुदीमध्ये प्रतिसाद दिला असून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी अपिलार्थीस आवश्यक तपशीलासह कळविले आहे. केवळ अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०८-२००९ ही मागची तारीख टाकून ते पत्र दिनांक ११-०९-२००९ रोजी पोस्टात टाकले व ते त्यांना दिनांक १६-०९-२००९ रोजी प्राप्त झाले, असे जरी गृहीत धरले तरी यावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०८-२००९ रोजी अर्ज केल्यानंतर ३० दिवसांनी ज्ञात झालेले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीनुसार जर अपिलार्थी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसेल तर त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी वर सूचित केल्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा करणे जरुरीचे आहे. त्यामुळे त्यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले होते.

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

आज दिनांक २३-११-२०१० रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे आयोगासमोर कोणतीही नवीन बाब आली नाही.

मागील सुनावणीच्या वेळी काढलेले निष्कर्ष कायम करण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २३-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जनार्दन दत्तात्रय साळी, एस. टी. कॉलनी, नाईक वाडा, स्वयंवर मंगल कार्यालयाजवळ, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६१५

सुनावणी दिनांक २३-११-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. जाफर हुसेन कमाल पि. गुलाम हुसेन,<br>रा. घर नं. ११४-९६, देवडी बाजार, औरंगाबाद | : | अपिलार्थी : | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य<br>वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | : | प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य<br>वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | | : | प्रतिनिधी-<br>उपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | : | प्रतिनिधी-<br>उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे मूळ दि. २५.०७.२००८ रोजीचे द्वितीय अपील दिनांक ३०-११-२००९ रोजी फेरसादर केले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी दिनांक २४-०३-२००७ रोजी वक्फ मंडळाकडे केलेल्या लेखी तक्रारीमध्ये मंत्री महोदयांनी दिलेल्या चौकशीच्या आदेशावर वक्फ बोर्डाने कोणते पाऊल उचलले व केलेल्या चौकशीच्या सत्यप्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०२-०६-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०७-२००८ रोजीच्या

पत्राद्वारे माहिती पुरविली. या पत्रासोबत त्यांनी अपिलार्थीने मंत्र्याकडे केलेल्या तक्रारीवर त्यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नाही असे एका साध्या कागदावर उर्दूत लिहून अपिलार्थीस माहिती पुरविलेली आहे. तथापि या माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने परत दिनांक ०४-०७-२००८ रोजीच्या पत्राद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे तक्रार केली व दिनांक २५-०७-२००८ रोजी आयोगाकडे अपूर्ण स्वरुपात द्वितीय अपील दाखल केले. यानंतर आयोगाकडे घेतलेल्या आक्षेपाची पुर्तता करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १३-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते.प्रकरणात आज दि. २३.११.२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मराठीतून माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देताना केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने त्यांनी ऑफीसचा शिक्का नसलेल्या एका कोऱ्या कागदावर माहिती पुरविली आहे. कार्यालयाच्या जावक क्रमांकाच्या शिक्क्याशिवाय या माहितीला काहीही अर्थ नाही. त्यामुळे या माहितीचा त्यांना काहीही उपयोग होणार नाही, असे त्यांना वाटते.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस सदरची माहिती त्यांच्या कार्यालयाच्या पत्राबरोबर पुरविली आहे. त्यामुळे ही माहिती, त्यांच्या कार्यालयाने पुरविलेली अधिकृत माहिती आहे.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याशी वैयक्तिक पातळीवर कधी संपर्क साधला होता याचा पुरावा अपिलार्थीकडे नाही. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे प्रथम अपील केल्यानंतर दिनांक ०२-०७-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकाडील उपलब्ध असलेली माहिती पुरविली. तथापि या माहितीच्या वैधतेबाबत अपिलार्थी साशंक आहेत. कारण ही माहिती एका कोऱ्या कागदावर उर्दू भाषेत लिहिलेली आहे. अपिलार्थी यांचा या माहितीच्या वैधतेबाबतचा आक्षेप आयोग मान्य करीत असून, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे

की, त्यांनी अपिलार्थीच्या विचाराधीन प्रकरणाशी संबंधित त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात दिलेली माहिती त्यांच्या कार्यालयाच्या शिक्क्यासह आणि जावक क्रमांकासह ती साक्षांकित करुन अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरविली.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून ८ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले होते.

४. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

५. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत साक्षांकित स्वरुपात विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस दिनांक १५-०७-२०१० रोजी माहिती दिली असल्याचे आयोगास सांगितले. आज रोजी या माहितीची एक प्रत अपिलार्थीस समक्ष दिली.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २३-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जाफर हुसेन कमाल पि. गुलाम हुसेन, रा. घर नं. ११४-९६, देवडी बाजार, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६१७

सुनावणी दिनांक २३-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. कविताबाई व्यंकटराव कमठाणे,<br>रा. लोहारा, हा. मु. बस्ववेश्वर चौक, सारडा निवास, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | उपस्थित<br>(प्रतिनिधी-<br>श्री. बेग एन.एम.<br>अधीक्षक,<br>सा.प्र.वि.जि.प. लातूर |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे, दिनांक २७-०७-२००९ रोजी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, देवणी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय, अशी माहिती स्पीड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने दिलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही चालू असल्याचे व अपिलार्थीचा तक्रार अर्ज पंचायत समिती, देवणी यांच्याकडे चौकशीकरिता पाठविला असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १८-०९-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.१०.२००९ रोजी निर्णय देऊन माहिती अधिकाऱ्यास, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चा सखोल अभ्यास करुन विहित कालावधीमध्ये प्रकरण

निकाली काढण्याच्या सुचना दिल्या व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश दिलेले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १३-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते.

मागील सुनावणीच्यावेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी दिनांक १४-०७-२००९ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी यांना, अपिलार्थीस झालेल्या मारहानी संदर्भात केलेल्या तक्रार अर्जावरील निर्णयाची प्रत त्यांना हवी असल्याचे नमूद केले.

जन माहिती अधिकाऱ्याने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जास अनुसरुन त्यांनी दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या तक्रार अर्जासंदर्भात केलेली कार्यवाही कळविली आहे. या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती आयोगास अवगत करुन देताना त्यांनी सांगितले की, अपिलार्थीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी यांच्याकडे दिनांक १४-०७-२००९ रोजी त्यांना श्री. बालाजी विराप्पा कमठाने यांनी केलेल्या मारहानीमुळे श्री. बालाजी विराप्पा कमठाने यांना सेवेतून निलंबीत करण्याची मागणी त्यांनी या तक्रार अर्जामध्ये केली होती. श्री. बालाजी विराप्पा कमठाणी यांना निलंबीत करावे अशी अपिलार्थीची मुख्य मागणी असून, सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. या प्रकरणी त्यांच्या कार्यालयाने गट विकास अधिकाऱ्यास त्यांचा चौकशी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या, त्याप्रमाणे संबंधितांनी या प्रकरणाचा चौकशी अहवाल त्यांच्याकडे दिलेला आहे. या चौकशी अहवालाची प्रत ते अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी यांच्याकडे केलेल्या तक्रार अर्जावरील अंतीम निर्णय, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित आहे. या प्रकरणाची जिल्हा परिषद लातूरमधील शिक्षण विभागाअंतर्गत अद्यापही चौकशी चालू आहे. या प्रकरणामध्ये शिक्षण विभागाने अद्यापपावेतो कोणताही अंतीम निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या तक्रार अर्जावर शिक्षणाधिकाऱ्याने घेतलेला निर्णय अशी माहिती आजही उपलब्ध होऊ शकणार नाही. तथापि अपिलार्थीस त्यांच्या तक्रार अर्जावर शिक्षणाधिकारी कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीचा दिनांक १४-०७-२००९ रोजीच्या अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून या प्रकरणी त्यांच्या कार्यालयाने सर्व संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या

पत्रव्यवहाराच्या प्रती, चौकशी अहवालाच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात व तसेच अपिलार्थीच्या तक्रार अर्जासंदर्भात त्यांच्या कार्यालयाने अद्यापपावेतो कोणताही अंतीम निर्णय घेतला नसल्याचे अपिलार्थीस याच माहितीबरोबर कळवावे. जेणेकरुन अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती माहिती पूर्णतः प्राप्त होऊ शकेल.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये शिक्षणाधिकारी कार्यालयाने त्यांच्या तक्रारीवर कोणताही निर्णय न घेतल्याने व त्यांनी श्री. बालाजी विराप्पा कमठाणी यांना निलंबीत न केल्यामुळे आयोगाकडे विचाराधीन अपील केल्याचे नमूद केले आहे. या मुद्यावर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराच्या तक्रारीवर निर्णय देणे व अर्जदाराने ज्या व्यक्तीविरुध्द तक्रार केली असेल त्या व्यक्तीला सेवेतून निलंबीत करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करणे अशा स्वरुपाची कार्यवाही करण्याची अधिकारिता आयोगास नाही. फार तर अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही इतपत माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होऊ शकेल. त्याप्रमाणे वरील परिच्छेदामध्ये आयोगाने आदेश दिलेले आहेत. ज्या कारणास्तव अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे त्या कारणाकरिता निर्णय घेण्याची अधिकारिता आयोगास नाही, हे अपिलार्थीच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले होते.

६. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

७. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या तक्रार अर्जावर त्यांच्या कार्यालयाने विविध सार्वजनिक प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या व चौकशी अहवालाच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवाव्यात.

आज रोजी सुनावणीच्या वेळी फक्त जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्यांनी नवीन काहीही आयोगास सादर केले नाही.त्यामुळे मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने काढलेले निष्कर्ष विचारात घेऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या तक्रार अर्जावर त्यांच्या कार्यालयाने विविध सार्वजनिक प्राधिकरणाशी केलेल्या पत्र व्यवहाराच्या व चौकशी अहवालाच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच तीस

दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवाव्यात.

| | |
|---|---|
| **औरंगाबाद** | **( दी. बा. देशपांडे )** |
| **दिनांक : २३-११-२०१०** | **राज्य माहिती आयुक्त** |
| | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१. सौ. कविताबाई व्यंकटराव कमठाणे, बस्ववेश्वर चौक, सारडा निवास, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६१८

सुनावणी दिनांक २३-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मोहमद शुकूर इस्माईल बागवान,<br>मु. पो. भोकरंबा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : अपिलार्थी : | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>लातूर | : | उपस्थित<br>(प्रतिनिधी-श्री.बेग एन.एम. अधीक्षक, सा.प्र.वि.जि.प.लातूर) |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे भोकरंबा येथील रस्त्याच्या संदर्भात गट क्रमांक २४३ बाबतीतील जन माहिती अधिकारी यांच्या अहवालासंदर्भात काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - भोकरंबा येथील गट क्रमांक २४३ मध्ये पूर्वीचाच रस्ता आहे असे ज्या पुराव्याआधारे नमूद केले गेले आहे त्या महसूल पुराव्याची छायांकित प्रत, पुरावा नसल्यास अहवालात खोटी माहिती देण्याचे कारण व या गट क्रमांकामध्ये १०० ते १५० घरे कुटूंबे वास्तव्य करुन आहेत, असे लिहिले आहे त्या कुटुंबाची यादी घर नंबरसह - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २९-०७-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०८-२००९ रोजी कथित निर्णय

दिला आहे. या निर्णयाद्वारे त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर यांच्याकडे, ते सुनावणीसाठी गैरहजर राहिल्याबाबत स्पष्टीकरण मागविले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १३-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दि. २३.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, जन माहिती अधिकाऱ्यास आयोगास कोणतीही माहिती पुरविता आली नाही. तथापि त्यांच्या एकत्रित युक्तिवादावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागताना जो संदर्भ विचारात घेतला आहे तो म्हणजे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर यांनी दिनांक १६-०३-२००९ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, लातूर यांना दिलेल्या पत्रात, या पत्रामध्ये गट क्रमांक २४३ मध्ये झालेल्या रस्त्याचा उल्लेख आहे व तसेच अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये गटाच्या जागेमध्ये अंतीम १०० ते १५० कुटुंब वास्तव्य करुन राहत असल्याचे नमूद केले आहे. गट क्रमांक २४३ हा अपिलार्थीच्या मालकीचा आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास गट विकास अधिकाऱ्याने दिनांक १६-०३-२००९ रोजी पुरविलेल्या माहितीसंदर्भातील जागेचे मालक व १०० ते १५० कुटुंबाची यादी या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस अपेक्षित असल्याचे आयोगास आढळून येत आहे. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारले असता, त्यांनी सदरचा अहवाल प्रत्यक्ष पाहणी करुन तयार केला असल्याचे आणि याबाबतीत त्यांच्याकडे कोणताही पुरावा बहुतेक संदर्भात उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असेही अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुरावा नसल्यास अहवालात खोटी माहिती देण्याचे कारण काय अशी माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाचे अथवा कृतीचे कारण त्यांनी अर्जदारास स्पष्ट करणे अथवा त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण अपिलार्थीस देणे अशाप्रकारच्या प्रक्रियेचा समावेश नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित दोन मुद्यांवरील

माहिती ही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या दोन मुद्यांसदंर्भात जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास सदरचा अहवाल हा प्रत्यक्ष पाहणी करुन सादर केलेला आहे. हा अहवाल उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करताना त्यांनी कोणत्याही कागदोपत्री अस्तित्वात असलेल्या पुराव्याची नोंद घेतली नाही. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती जर त्यांच्याकडे उपलब्ध असेल तर ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी आणि जर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्याकडे मागणी केलेल्या पुराव्याची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे ज्या तक्रारीसंदर्भात अहवाल सादर केला आहे त्यासंदर्भात वस्तुस्थिती स्पष्ट करणारी माहिती अपिलार्थीस याच मुदतीत कळवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले होते.

८. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

९. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सादर केले की, ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत. तथापि आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आयोगासमोर माहिती दिली व अपिलार्थीस सदर माहिती मिळाल्याबाबत अपिलार्थीने पोच दिली.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २३-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहमंद शुकूर इस्माईल बागवान, मु. पो. भोकरंबा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६१९

सुनावणी दिनांक २३-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाबुराव शंकरराव बावीसकर,<br>रा.२२२, हरिहर, अजयदीप शॉपिंग सेंटरच्या समोर,<br>एन-३ सेक्टर, सिडको, औरंगाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,वडगाव गुंधा, तालुका जिल्हा बीड | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, बीड | : | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| जन अपिलीय अधिकारी | : | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, बीड | : उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष, कै.सुंदरराव पिराजी मोरे यांचा १९९० साली किंवा त्या दरम्यान मृत्यू झाला आणि त्यांचा अंत्यविधी संस्कार ग्रामपंचायत, वडगाव गुंधा यांच्या हद्दीमध्ये झाला अशी अपिलार्थीची माहिती आहे, त्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या ग्रामपंचायतीचे त्रयस्थ पक्षाच्या मृत्यूपत्राचे प्रमाणपत्र, अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. ०९.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०८.२००९ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.०८.२००९ रोजी टपालाने माहिती पुरविल्याचे अपिलार्थीस अवगत केले व

सदरचे टपाल अपिलार्थीस न मिळाल्यास ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १३.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. २३.११.२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी ज्या व्यक्तीच्या मृत्यू प्रमाणपत्राबाबत माहिती मागितली आहे त्या व्यक्तीचा अंत्यविधी संस्कार ग्रामपंचायत वडगाव गुंधा यांच्या हद्दीत झाला असल्यामुळे त्या व्यक्तीचे मृत्यू प्रमाणपत्र ग्रामसेवक,ग्रामपंचायत वडगाव गुंधा यांनी निर्गमित करणे आवश्यक आहे. तथापि त्यांनी त्यांची ही जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली नाही. अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाच्या नावाचा, 'कै.सुंदरराव पिराजी मौजे' असा उल्लेख केला परंतु अपिलार्थीस 'कै. सुंदरराव पिराजी मोरे ' यांच्याशी संबंधित माहिती हवी होती. श्री. सुंदरराव पिराजी मोरे यांचा अंत्यविधी जन माहिती अधिकारी यांच्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत झाला असल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी निबंधक या नात्याने ग्रामसेवकाने अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती देणे आवश्यक आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती अधिकाऱ्यास पाठीशी घालून एकमेकांशी संगनमत करुन त्यांच्यावर कारवाई केली नाही. माहिती अधिकार कायद्याप्रमाणे ही माहिती देणे आवश्यक असूनही संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने त्यांची जबाबदारी पार न पाडल्यामुळे अपिलार्थीस मानसिक तथा आर्थिक नुकसान पोहोचले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २७.०४.२००९ रोजीच्या अर्जास दि. २४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. जन्म-मृत्यू नोंद कायद्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीचा मृत्यू ज्या ठिकाणी होतो, त्याच ठिकाणी मृत्यूची नोंद केली जाते. या प्रकरणी त्रयस्थ पक्ष कै. सुंदरराव पिराजी मोरे यांचा मृत्यू औरंगाबाद येथे महानगरपालिका हद्दीत झाला असून औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयात जन्म-मृत्यू नोंदणीद्वारे त्यांच्या मृत्यूची दि. १५.१२.१९९० रोजी '७५४९' अन्वये नोंद घेतली गेली आहे. एकाच व्यक्तीच्या जन्म अथवा मृत्यूची नोंद दोन स्वतंत्र ठिकाणी वेगवेगळया नोंदी घेतल्या जात नाहीत. तसेच अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्रयस्थ व्यक्तीच्या मृत्यू प्रमाणपत्रात बदल करुन नंतर सुधारीत मृत्यू प्रमाणपत्र देणे त्यांना शक्य नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीस या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्रयस्थ पक्ष कै. सुंदरराव पिराजी मोरे यांचे मृत्यू प्रमाणपत्रात बदल करुन सुधारीत प्रमाणपत्र अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीपुरते या प्रश्नाकडे पहावयाचे झाल्यास अर्जदाराने

मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्याची प्रक्रिया या अधिनियमामध्ये समाविष्ट आहे. अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या मृत्यूची नोंदणी झाली नसल्यामुळे दि. २४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे योग्य तो प्रतिसाद दिला आहे. आज रोजी जन माहिती अधिकाऱ्याने त्यांच्या युक्तिवादापृष्ठयर्थ त्रयस्थ पक्ष,कै. सुंदरराव पिराजी मोरे यांचे औरंगाबाद महानगरपालिकेने जारी केलेले क्र.'७५४९' च्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही, असे दिसून येते. अपिलार्थीस या प्रमाणपत्राची प्रत अपेक्षित असल्यास त्यांनी मृत्यू प्रमाणपत्राची प्रत प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये जन माहिती अधिकाऱ्याने त्रयस्थ पक्षाच्या नावाचा 'श्री. सुंदरराव पिराजी मौजे' असा उल्लेख केलेला असल्याचे आयोगास आढळून येत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती संबंधित व्यक्तीच्या नावात दुरुस्ती करुन, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या दि. २७.०४.२००९ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.०५.२००९ रोजी प्रथम प्रतिसाद देणे अपेक्षित असताना त्यांनी अपिलार्थीस दि. २४.०८.२००९ रोजी म्हणजेच, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर दिला असल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्याचा अथवा नाकारण्याचा विकल्प जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेला आहे. तथापि या दोन विकल्पापैकी एकाही विकल्पाचा वापर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत केलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांनी या प्रकरणी संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडगाव गुंधा यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही नवीन माहिती आयोगास सादर केली नाही.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोगातर्फे

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहितीची छायांकित प्रत हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडगाव गुंधा, तालुका जिल्हा बीड यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २३-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबुराव शंकरराव बावीसकर, रा.२२२, हरिहर, अजयदीप शॉपिंग सेंटरच्या समोर, एन-३ सेक्टर, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय, वडगाव गुंधा, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६२०

सुनावणी दिनांक २३-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. द्वारकेश रमण गायकवाड,<br>रा. आर. पी. रोड, नगर परिषद शाळेमागे, जालना | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना | : | उपस्थित |

त्रयस्थ पक्ष : श्री. मनगटे, शाखा अभियंता : अनुपस्थित

श्री. आझमी, शाखा अभियंता : उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १३-०७-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

मागील सुनावणीच्या वेळी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी यांनी अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दि. २०.११.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकाराखालील मागणी केलेली माहिती त्यांना दि. २०.११.२००९ रोजी पूर्णत: दिली असल्यामुळे त्यांचा अपील अर्ज निकाली काढण्यास त्यांची हरकत नाही व या प्रकरणाबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहणार नाही.

मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी दि. १२.११.२००९ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर माहिती दिली आहे

व यासंदर्भात अपिलार्थीची कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे त्यांनी कबूल केल्यामुळे अपिलार्थीचे व तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीची असलेली अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात कोणतेही भाष्य करावयाचे नसल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी नव्याने काहीही सांगावयाचे नाही असे आयोगापुढे सांगितले.

मागील सुनावणीच्यावेळी आयोगातर्फे काढलेले निष्कर्ष कायम करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २३-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. द्वारकेश रमण गायकवाड, संपादक- सा.कलियुगाचा भ्रष्टाचार, आर. पी. रोड, नगर परिषद शाळेमागे, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६२५

सुनावणी दिनांक २३-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नरवाडे प्रसन्नजित गणपतराव,<br>रा. गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा परिषद मुलांचे विद्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी | : मुख्याध्यापक, जिल्हा परिषद हायस्कुल (मुलांचे), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेस प्राप्त होणा-या विविध अनुदानासंदर्भात आणि शालेय पोषण आहारासंदर्भात काही माहिती स्पीड पोस्टाव्दारे मागितली होती. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २६-०८-२००९ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०९-२००९ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी या प्रकरणी मागितलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १३-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १०-०९-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे विनामूल्य पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीच्या संदर्भातील पोस्टाची पावती आयोगास सादर केली. यावरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, जन माहिती अधिका-याने दिनांक १०-०९-२००९ रोजी आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती विनामूल्य व टपालाव्दारे पुरविल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही व तसेच त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील करण्याचे कारण जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेतली नाही व त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही असे दिले आहे. याबाबत अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली असल्यामुळे आणि प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही आक्षेप आयोगास लिखीत स्वरुपात प्राप्त झाले नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील आवश्यक त्या कागदपत्राअभावी आणि अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आयोगापुढे काहीही सांगावयाचे नाही असे सादर केले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २३-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नरवाडे प्रसन्नजित गणपतराव, रा. गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद हायस्कुल (मुलांचे), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६२६

सुनावणी दिनांक २३-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीनिवास धोंडिराम मुंडे,<br>रा. पांगरी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | | : अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : उपस्थित (प्रतिनिधी- श्री. विनोद भरतराव बळवंत, लिपीक |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०२-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १३-०७-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

दिनांक १३-०७-२०१० रोजीच्या सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १३-०७-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०७-०२-२००९ रोजी व्यक्तिशः प्राप्त झाली असल्याने त्यांना विचाराधीन अपील चालविण्याची इच्छा नसल्याचे नमूद केले आहे व सदरचे अपील निकाली काढावे अशी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची या अर्जाव्दारे केलेली विनंती आयोगाने मान्य करुन अपील खारीज करण्यात येत असल्याचे अभिप्राय मागील सुनावणीच्यावेळी व्यक्त केले होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्यांनी नवीन कोणतीही माहिती आयोगास सादर केली नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २३-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. श्रीनिवास धोंडिराम मुंडे, रा. पांगरी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मनोहर धनाजी म्हस्के,<br>रा. मोतीवालानगर, जालना रोड, चिकलठाणा, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. बबनराव ढाकणे विद्यालय, चिकलठाणा, औरंगाबाद | | |
| अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चेलीपुरा हायस्कूल, औरंगाबाद | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-११-२००९ |
| ९ | अपील मागे घेत असल्याचे अपिलार्थीचे पत्र | | दि. ०७-०७-२०१० |

अपिलार्थीने त्यांच्या स्वत:च्या संदर्भातील दिनांक १६-०७-१९८६ ते १०-०४-१९९० या कालावधीतील उपस्थितीपटाची व याच कालावधीतील वेतनबिलाची माहिती जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०७-२०१० रोजीचे पत्राने आयोगास कळविले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असून त्यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. तसेच विचाराधीन अपील स्वखुशीने मागे घेत असल्याचे व ते रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे. या पत्राचा विचार आयोगाने केला असून अपिलार्थीस आता माहिती मिळली असल्याने व त्यांनी अपील रद्द करण्याची विनंती केली असल्यामुळे अपिलार्थीची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील खारीज.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोहर धनाजी म्हस्के, रा. मोतीवालानगर, जालना रोड, चिकलठाणा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. बबनराव ढाकणे विद्यालय, चिकलठाणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चेलीपुरा हायस्कूल, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रियाजखान मुरादखान पठाण, : अपीलकर्ता
दर्गाबेस आठवडी बाजार, वैजापूर, तालुका वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता, उपविभाग, सा. बा. (पश्चिम), वैजापूर
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद
अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम)
विभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर - श्री. के. आर. गाडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद - श्री. पी. पी. सोनवणे | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. पवार | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. निरंक |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांची बाजू मांडण्यासाठी उपस्थित नाहीत. आज रोजी सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांची बाजू मांडली. प्रथम अपिलीय अधिका-याने आयोगासमोर असे सादर केले की, त्यांनी या प्रकरणी अपिलावर दिनांक ३१-१०-२००९ रोजी निर्णय दिला असून एक महिन्याच्या आत अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे. पुराव्यासाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सदर आदेशाची साक्षांकीत प्रत सादर केली.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सादर केले की, त्यांनी अपिलार्थीस प्रथम अपिलीय अधिका-याने दिलेल्या निर्णयाप्रमाणे संपूर्ण माहिती दिनांक २८-०६-२०१० रोजी व्यक्तिशः व विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने त्याबाबत पोच दिलेली आहे त्याची सत्यप्रत त्यांनी आयोगापुढे सादर केली.

ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रियाजखान मुरादखान पठाण, दर्गाबेस आठवडी बाजार, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सा. बा. (पश्चिम), वैजापूर

तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. एस. एन. काद्री,<br>आरेफ कॉलनी, दिलरस कॉलनी जवळ, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी), औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी), औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी - श्री. धा. क. चव्हाण | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक - डॉ. पी. एल. गट्टाणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-११-२००९ |

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २०-०८-२००९ रोजीच्या अर्जान्वये अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी), औरंगाबादकडील काही माहिती मागितली आहे. ही माहिती सर्वसाधारणतः खालीलप्रमाणे आहे.

१. भंगार विक्रीचे आदेश देताना अवलंबिलेले नियम.

२. याबाबत शासकीय नोंदणीकृत ठेकेदार यांना टेंडर देण्याचे आदेश, P.W.D. विभागाचे जी. आर.

३. टेंडर ओपनिंगचे नियम व कायदा.

४. दिलेल्या बाबी व प्रत्येकाची किंमत त्याची प्रत.

५. एका वर्षाच्या अधिव्याख्यात्याची तात्पुरती नियुक्ती केली आहे त्याच्या शासन निर्णयाची प्रत.

६. श्री. पवार, लिपीक यांना कार्यमुक्त करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची / पत्राची प्रत.

उपरोक्त माहिती अपिलार्थीस देय ठरते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांची बाजू आयोगाने ऐकून घेतली. जन माहिती अधिका-याने आयोगास सादर केले की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०८-२००९ रोजी प्राप्त झालेला अर्जाची दखल घेऊन त्यांनी दिनांक १५-०९-२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी व्यक्तिशः कार्यालयात उपस्थित राहून सशुल्क माहिती घेऊन जाण्याचे कळविले. तथापि यावर अपिलार्थी आजपावेतो व्यक्तिशः उपस्थित राहिले नाहीत व माहिती नेली नाही.

प्रथम अपिलीय अधिका-याने त्यांच्या युक्तिवादात सांगीतले की, दिनांक १६-१०-२००९ रोजी प्रथम अपिलाचा निर्णय दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर दिनांक १६-१०-२००९ रोजी निर्णय दिला की जन माहिती अधिका-याने विहित मुदतीत कळविले असल्याकारणाने अपिलार्थीने जन माहिती अधिका-याकडे आवश्यक ते शुल्क रुपये ५२ इतके भरुन माहिती घेऊन जावी. जन अपिलीय अधिकारी यांनी असाही खुलासा केला की, दिनांक ०३-११-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केली होती तथापि त्यांनी ती स्वीकारली नाही.

अपिलार्थी आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास अवगत झाली नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करुन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली व वर विवेचनात उद्‌धृत केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत डाकेने पुरवावी. या आदेशाबरहुकूम अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एस. एन. काद्री, आरेफ कॉलनी, दिलरस कॉलनी जवळ, औरंगाबाद.
२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महेमुद खान मौला खान, : अपीलकर्ता
घर क्रमांक ५-१९-८४, सब्जी मंडी, पैठणगेट जवळ,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महेमुद खान मौला खान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता - श्री. ए. बी. देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | | दि. १८-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, त्यांनी दिनांक ०३-०८-२००९ रोजी अपिलार्थीस कळविले की, त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर साधनसामग्री वळवावी लागणार आहे म्हणून अर्ज नामंजूर करुन निकाली काढण्यात येत आहे. आयोगास ही बाब योग्य वाटत नाही कारण मागितलेली माहिती देण्याकरिता त्यांना मोठ्या प्रमाणावर साधनसामग्री लागत असली तरी अपिलार्थीस ही माहिती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे योग्य ठरले असते परंतु असे घडले नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २९-०९-२००९ रोजीच्या सुनावणीमध्ये, "अर्जदार हजर. अपेक्षित माहिती बाबत माहिती दिली. आता काही उजर नाही" असे नोंदविले आहे. एकंदरीत या प्रकरणी दुर्लक्ष झालेले आहे. अपिलार्थी हे याच कार्यालयात शाखा अभियंता म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी नगरपरिषदेच्या काळापासून ते आजपर्यंत भूसंपादनाबाबतची व्यापक माहिती मागितली आहे. अशी माहिती उपलब्ध आहे किंवा नाही, उपलब्ध असल्यास देणे व उपलब्ध नसल्यास नाही असे कळविणे अभिप्रेत होते. तसे जन माहिती अधिकारी यांनी न करता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यासंदर्भात बेपर्वा वृत्ती दर्शविली आहे असे आयोगास वाटते. तरी जन माहिती अधिकारी यांनी या माहितीच्या उपलब्धतेबद्दल अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने कळवावे. तसेच प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी या प्रकरणी व्यक्तिशः लक्ष घालावे व माहिती अधिकार कायद्याबाबत आपले अधिकारी / कर्मचारी गांभीर्याने पावले उचलतील असे पहावे. त्याचप्रमाणे विचाराधीन माहितीबद्दल सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी ही माहिती लवकरात लवकर कशा प्रकारे एकत्रित होईल व एका ठिकाणी उपलब्ध होईल याबाबत कार्यवाही करावी.

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी या माहितीच्या उपलब्धतेबद्दल अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने कळवावे व जी माहिती उपलब्ध आहे ती तात्काळ विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

२. प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी या प्रकरणी माहिती अधिकार कायद्याबाबत आपले अधिकारी / कर्मचारी गांभीर्याने पावले उचलतील असे पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महेमुद खान मौला खान, घर क्रमांक ५-१९-८४, सब्जी मंडी, पैठणगेट जवळ, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (नगर विकास ) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाजीराव नामदेव नाकिरे, : अपीलकर्ता
मुख्य कार्यालय शिवक्रांती दल कार्यालय, सिध्देश्वर सह. साखर कारखाना, माणिकनगर (भवन), तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाजीराव नामदेव नाकिरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी - श्री. रविंद्र शामराव दारुंटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद - रामलींग भिमराव कसबे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-१२-२००९ रोजी अपिलाची सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती द्यावी असे आदेशित केले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२-१२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे नोंदणीकृत डाकेने माहिती पाठविली आहे तथापि ती अपिलार्थीस मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर त्यांना दिनांक २२-१२-२००९ रोजीच्या पत्राची प्रत माहितीसह दिली. ती अपिलार्थी यांनी स्विकारली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३०-११-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाजीराव नामदेव नाकिरे, मुख्य कार्यालय शिवक्रांती दल कार्यालय, सिध्देश्वर सह. साखर कारखाना, माणिकनगर (भवन), तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.
२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. परमेश्वर साहेबराव बिडे,<br>ई-७९, शिवधन, शिवशंकर कॉलनी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग वैजापूर, जिल्हा औरंगाबाद - श्री. के. आर. गाडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद - प्रतिनिधी श्री. देशपांडे, उप कार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३-०८-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-१०-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी उप कार्यकारी अभियंता उपस्थित आहेत. त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थीच्या दिनांक ०८-०५-२००९ रोजीच्या अर्जाची प्रत कार्यकारी अभियंता कार्यालयाकडून दिनांक १३-०५-२००९ रोजी त्यांच्या उपविभागाला प्राप्त झाली. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती त्यांना मोठ्या प्रमाणात आढळली. कागदपत्र तसेच दस्तऐवज यांचे एकत्रीकरण करुन झेरॉक्स प्रती इत्यादी काढण्याकरिता काही कालावधी लागला व त्यांनी ही माहिती दिनांक २०-०७-२००९ रोजी कार्यकारी अभियंता कार्यालयास पाठविली. दरम्यानच्या काळात अपिलार्थीने दिनांक १०-०६-२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०७-२००९ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली बहुतांश माहिती अपिलार्थीला समक्ष देण्यात आली व त्याची पोच पावती आज रोजी आयोगापुढे सादर करण्यात आली. उर्वरीत माहिती दिनांक १८-०९-२००९ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः व विनामूल्य देण्यात आली. अशी एकंदरीत ३०० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस देण्यात आली. दिनांक १८-०९-२००९ रोजी दिलेल्या माहितीबाबतची पोच अपिलार्थीने दिली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले व त्याची पोच पावती आयोगास सादर केली. या सर्व बाबी विचारात घेता अपील निकाली काढण्यात यावे या निर्णयाप्रत आयोग आला आहे. सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. परमेश्वर साहेबराव बिडे, ई-७९, शिवधन, शिवशंकर कॉलनी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. महंमद अनीसोद्दीन सिद्दीकी,<br>ग्लोबल मार्केट, फ्लॅट नं. A - १, शहाबाजार, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नोंदणी जन्म व मृत्यू कार्यालय, नगरपरिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महंमद अनीसोद्दीन सिद्दीकी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९,<br>२९-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत दिली आहे असे आयोगास आढळून आले आहे व ही बाब अपिलार्थीस मान्य आहे. त्याचप्रमाणे दिनांक २९-१२-२००९ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांच्याकडून माहितीच्या छायांकीत प्रती देण्यात आल्या आहेत असे कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. त्यामुळे या प्रकरणात आता कार्यवाहीची काही आवश्यकता नाही असे आयोगाचे मत झाले आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील खारीज करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३०-११-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महंमद अनीसोद्दीन सिद्दीकी, ग्लोबल मार्केट, फ्लॅट नं. A - १, शहाबाजार, औरंगाबाद.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नोंदणी जन्म व मृत्यू कार्यालय, नगरपरिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती पोर्णिमा पथाडे-सोनकांबळे, : अपीलकर्ता
२५४, 'अनुभूती', नंदनवन कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी, :
अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती पोर्णिमा पथाडे-सोनकांबळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद - एम. ए. जावेदखान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद - (प्रतिनिधी) - श्री. ए. एस. दामले, प्राध्यापक, सुक्ष्मजीवशास्त्र विभाग | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. ए. एस. दामले, प्राध्यापक, सुक्ष्मजीवशास्त्र विभाग उपस्थित आहेत.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असे सांगितले की, त्यांनी एकूण तीन मुद्दयांवर काही माहिती मागितली होती. त्यापैकी पहिल्या मुद्दयाची माहिती मिळाली आहे. दुस-या व तिस-या मुद्दयाची माहिती अद्यापही मिळालेली नाही. जन माहिती अधिका-याने दिलेली माहिती अपिलार्थीने जी माहिती मागितली होती तिच्याशी अनुसरुन नाही. अपिलार्थीने विभागीय निवड मंडळातर्फे निवड झालेल्या अधिव्याख्यात्याला मंजूर असलेल्या अर्जित रजा व वैद्यकीय रजेसंबंधी माहिती मागितली होती. त्यांच्या या सेवेच्या सेवाशर्ती प्रमाणे रजेमध्ये फरक असू शकतो ही बाब जन माहिती अधिकारी यांनी बघणे आवश्यक होते व त्यानुसार माहिती पुरविणे आवश्यक होते. जन माहिती अधिकारी याबाबत आयोगाकडे समाधानकारक खुलासा देऊ शकले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याने त्यांच्या सुनावणीमध्ये दिनांक १३-११-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्याबाबत मार्गदर्शन करुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या प्रती तात्काळ देण्याचे निर्देश दिले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले की, त्यांनी हीच माहिती इतर महाविद्यालयाकडून मागितली होती व ती त्यांना सहज प्राप्त झाली आहे. सध्या त्या याच महाविद्यालयात कार्यरत असून त्यांना ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडून मिळू शकली नाही. तसेच त्यांना झेरॉक्स प्रतीचा दर जास्त लावण्यात आला असल्याचे सांगितले. या सर्व बाबी आयोगास गंभीर वाटतात. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा एक संच आयोगापुढे सादर केला. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या कारणमीमांसेवरुन जन माहिती अधिका-याने दिलेली माहिती सकृतदर्शनी बरोबर असल्याचे आयोगास आढळून येत नाही त्याची तपासणी होणे आयोगास आवश्यक वाटते. सबब अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांनी या प्रकरणाशी संबंधित बाबींची सखोल चौकशी करणे व माहिती अधिकार कायद्याला संबंधितांनी गांभीर्यपूर्वक घेतले किंवा नाही हे पाहणे आयोगास आवश्यक वाटते. अधिष्ठाता यांच्या चौकशीत जन माहिती अधिकारी किंवा त्यांचे सहायक जन माहिती अधिकारी किंवा त्यांना माहिती पुरविण्यासाठी सहाय्य करणारे अधिकारी / कर्मचारी यांच्यामध्ये गांभीर्याचा अभाव दिसून आल्यास त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करावी अशी आयोगाची शिफारस आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांनी आयोगाने वर दिलेल्या शिफारसीनुसार सखोल चौकशीची प्रक्रिया त्वरीत सुरु करुन मुदतीत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती पोर्णिमा पथाडे-सोनकांबळे, २५४, 'अनुभूती', नंदनवन कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बंडू ध्रुपतराव ढाकणे,<br>रा. घर नं. सेक्टर क्यू ०२-०४-, एन-२, सिडको, गौतम बुध्दाच्या पुतळ्याजवळ, विठ्ठलनगर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. बबनराव ढाकणे विद्यालय, चिकलठाणा, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चेलीपुरा हायस्कूल, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी व त्यांचे- प्रतिनिधी ॲड श्री. एस. बी. गस्तगार | : | उपस्थित, उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रतिनिधी - श्री. पी. बी. मगर, उपशिक्षणाधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांच्या वकिलासह, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी आयोगास असे सांगितले की, मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात माहे जून, ९९ ते मे, २००३ हा कालावधी वगळता संबंधित शिक्षक शिक्षकेतर यांच्या हजेरीपटाच्या प्रती मिळाल्या आहेत. तसेच मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती मिळाली आहे असे अपिलार्थीच्या वकिलाने कबूल केले. मुद्दा क्रमांक ४ ची माहिती मिळाली नाही. तथापि अपिलार्थीच्या वकीलाने या माहितीची जरुरी नाही असे सुनावणीच्यावेळी सांगितले.मुद्दा क्रमांक ५, ६ व ७ ची जून ९९ ते मे २००३ ची माहिती मिळाली आहे. अतः मुद्दा क्र.१ ची माहे जून, १९९९ ते मे, २००३ या कालावधीची माहिती व मुद्दा क्र. ५,६ व ७ ची माहे मे,२००३ नंतरची माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, वारंवार विनंती करुनही सदरची माहिती कार्यकारी विश्वस्त, भगवान प्रतिष्ठान, औरंगाबाद (जे पूर्वी मुख्याध्यापक होते) यांच्याकडून बराच पत्रव्यवहार करुनही त्यांना माहिती मिळाली नाही. मुख्याध्यापकाने केलेल्या या प्रयत्नामुळे नाराज होऊन त्यांना त्रास देणे आता सुरु आहे, असे आयोगास सांगण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, या संस्थेवर प्रशासक नेमावा अशी शिफारस केली आहे व कारवाई प्रगतीपथावर आहे. जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, ते सन २००५ पासून या पदावर आहेत व ही माहिती संस्थेच्या मुख्याध्यापकाचा कार्यभार घेण्याच्या आधीची आहे. मागील माहिती त्यांच्याकडे नाही. जन माहिती अधिका-याने सर्व प्रयत्न केले पण त्यांना माहिती मिळत नाही असे आयोगाचे मत आहे व असे आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या वकिलाने सुध्दा कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी कसोशीने प्रयत्न करुनही त्यांना माहिती मिळत नाही व माहिती त्यांच्या ताब्यात नाही आणि त्यामुळे माहिती पुरविण्यास त्यांनी कसूर केला नाही, या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

सबब शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी या प्रकरणामध्ये दस्तऐवजाचा शोध घेणे व पहाणी करणे आवश्यक ठरत आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांनी या प्रकरणात वर नमूद केलेल्या मुद्यावर दस्तऐवजाचा शोध घेणे व प्रती प्राप्त करुन घेणे या करिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (३)(ख) अन्वये आयोग आदेशित करत आहे.

माहिती प्राप्त होताच अपिलार्थीस साक्षांकित प्रती पुरविण्यात याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक : ३०-११-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बंडू ध्रुपतराव ढाकणे, रा. घर नं. सेक्टर क्यू ०२-०४-, एन-२, सिडको, गौतम बुध्दाच्या पुतळ्याजवळ, विठ्ठलनगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. बबनराव ढाकणे विद्यालय, चिकलठाणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चेलीपुरा हायस्कूल, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अर्जून साहेबराव नवपूते, : अपीलकर्ता
मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
औरंगाबाद
प्रत्यक्षात : कृषि अधिकारी
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - श्री. एस. आर. छानवाल | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०१-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती (२३ पृष्ठे) त्यांना दिनांक ०९-१०-२००९ रोजी हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी दिनांक ११-०६-२००९ च्या अर्जान्वये त्यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांच्या दिनांक ०१-०१-२०१० रोजीच्या पत्रावरुन दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे अपिलार्थीने पाठविलेल्या दिनांक ०१-०१-२०१० रोजीच्या पत्राची प्रत सादर केली. आज रोजी अपिलार्थी उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही.

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेता अपील निकाली काढण्यात यावे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अर्जून साहेबराव नवपूते, मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद.
२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, : अपीलकर्ता
रा. एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सह सचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद
प्रत्यक्षात : कक्ष अधिकारी

जन अपिलीय अधिकारी तथा :
सह सचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद
प्रत्यक्षात : उप सचिव

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८४ | | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. | ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद श्री. हमीद अन्सारी | : | | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद श्री. ए. सी. बुधवंत | : | | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष | : | | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. | ०४-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. | ०७-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. | ३१-१२-२००८ |

अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीचा दिनांक ०४-०९-२००८ रोजीचा अर्ज त्यांना प्राप्त होताच तो त्यांनी मंत्रालय, मुंबईकडे दिनांक ०९-०९-२००८ रोजी पाठविला. कारण सदरची माहिती आस्थापना विभागाकडे मंत्रालयात उपलब्ध आहे. तसेच याबाबतची कल्पना अपिलार्थीस देऊन मंत्रालयातून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे त्यांना कळविण्यात आले. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १६-१०-२००८ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना आवश्यक ती माहिती पाठविली व ती माहिती अर्जदारास देण्यात यावी असे कळविण्यात आले. दरम्यानच्या काळात दिनांक ०७-१०-२००८ रोजी अपिलार्थीने प्रथम अपील सह सचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद यांच्याकडे दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-१०-२००८ रोजी अपिलावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असल्याकारणाने ती अपिलार्थीने व्यक्तिशः प्राप्त करावी असा निर्णय घेतला व तीस रुपये शुल्क भरुन माहिती घेऊन जावी असे आदेश दिले. तथापि अपिलार्थीने माहिती घेतली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, ९ पैकी ८ ची माहिती उपलब्ध आहे ती देण्यात येऊ शकते व मुद्दा क्रमांक ९ ची माहिती ही त्रयस्थ पक्षाच्या मत्ता व दायित्वशी संबधित आहे. तसेच ही माहिती उघड केल्याने त्यामुळे कलम ८ (१) (ञ ) नुसार कोणतेही सार्वजनिक हित (Public Interest) साध्य होत नाही म्हणून देय होत नाही.

वरील वस्तुस्थितीनुसार आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन ठेवली असून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व्यक्तिशः हवी असल्याचे त्यांच्या अर्जात नमूद केले आहे. तथापि त्यांनी ही माहिती घेतलेली नाही. याकरिता अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी देय माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठविण्यात यावी व त्याची पोच नस्तीवर ठेवण्यात यावी. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी देय माहिती त्यांना हे

आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ३०-११-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, रा. एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, जुनी उच्च न्यायालय इमारत, अदालत रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, विधी व न्याय विभाग, जुनी उच्च न्यायालय इमारत, अदालत रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन,<br>घर नं. १-१४-९६, देवडी बाजार, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,<br>पानचक्की, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,<br>पानचक्की, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| | अपिलार्थी - श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन | : | उपस्थित |
| | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०७-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०६-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०७-२००८<br>फेरसादर दिनांक<br>३०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. अपिलार्थीने आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना ऊर्दूमध्ये प्राप्त झालेली आहे तसेच ती प्रमाणित सत्यप्रत नाही त्यामुळे या माहितीचा उपयोग होऊ शकत नाही. यासाठी आयोग असे निर्देश देत आहे की, अपिलार्थीस सदरच्या माहितीचे इंग्लीश भाषांतर करुन प्रमाणित साक्षांकीत प्रत जन माहिती अधिकारी यांनी करुन द्यावी. तसेच ऊर्दूमध्ये पुरविण्यात आलेली माहिती सुध्दा प्रमाणित साक्षांकीत प्रत करुन त्याची प्रत अपिलार्थीस द्यावी म्हणून आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली ऊर्दूमधील माहिती प्रमाणित साक्षांकीत प्रत करुन द्यावी तसेच त्याचे इंग्लीशमध्ये भाषांतर करुन त्याची प्रमाणित साक्षांकीत प्रत अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य देण्यात यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ३०-११-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन, घर नं. १-१४-९६, देवडी बाजार, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.